एप्रिल २०२५

# ‘वेध सृजन’

स्वअध्ययनातून भविष्यवेधी शिक्षणाकडे...

अंक क्र 3

## वेध परिवार, भारत



प्रेरणास्थान तथा
मार्गदर्शक :- श्री. नंदकुमार साहेब, महासंचालक मिशन मनरेगा,

संपादक :- श्री. निलेश घुगे, (मनरेगा,ओ.बी.सी.,एम.पी.एस.पी.मुंबई )

कार्यकारी संपादक :- श्री. प्रभाकर हिप्परगे, (केंद्र प्रमुख, लातूर )

संपादन सल्लागार :- रोहिणी विद्यासागर (प्राथमिक शिक्षिका)
जि. प. कें. प्रा. शाळा कुंभेफळ ता. जि. छ. संभाजीनगर

:- अशोक निकाळजे ( सहशिक्षक )
जि. प. उच्च प्राथ. शाळा आगरनांदुर. ता. गेवराई. जि. बीड .

संपादन सचिव :- प्रियंका पाटील (राज्य प्रशिक्षण कक्ष, इ.मा.ब.क.मंत्रालय मुंबई

संपादन सहाय्य :- अनिता राठोड -सहशिक्षिका
कै.गुरुदयालसिंग राठोड माध्यमिक आश्रमशाळा गराडा,
ता.कन्नड,जि.छत्रपती संभाजीनगर.

:- हर्षदा चोपणे (सहशिक्षिका)
जि. प. शाळा सिंधीवाढोणा ता- (झरी जामनी) जिल्हा यवतमाळ

:- गजाजन तुरारे (पदवीधर विषय शिक्षक)
जि. प. उच्च प्राथ.शाळा रांगणा.ता. वणी, जिल्हा यवतमाळ.

:- नितीन मेमाणे ( पदवीधर शिक्षक)
जि. प. प्राथ. शाळा पांडे, तालुका:- भोर, जिल्हा:-पुणे

:- ललित उदापुरे (वेध स्त्रोत, क्षमता बांधणी कक्ष, वाशीम )

:- दिपेश पुरोहित (शिक्षक )
शास.पूर्व मा. विद्यालय बोरसी , ता. डभरा जि. सक्ति,
छत्तीसगढ़

# वेधसृजन अंक पार्श्वभूमी ...

**प्रिय वाचक,**

गेल्या चार वर्षांपासून वेध हा समूह राज्य तसेच देशपातळीवर शिक्षणाचा प्रचार प्रसार करत परिणामककारक अध्ययन अध्यापन पद्धतीच्या वाटा धुंडाळत आहे. हे करत असतांना नेमके मूल शिकते करण्याचे मार्ग कोणते आहेत? शिक्षकांनी/ पालकांनी कोणते मार्ग अवलंबन करत मूल शिकते करायचे आहे? शिक्षकांनी शिकवायचे की मूले स्वतः शिकतील यासाठी योजना आखायच्या? या आणि अशा अगणित प्रश्नांच्या मुळाशी जाऊन ठोस असे धोरण वेधला मिळालंय. ते म्हणजे मुलांना शिकवायचे नाही तर ते स्वतः शिकतील याचे नियोजन व्यवस्थापन आणि नेतृत्व करायचे. "शिकायचे कसे हे शिकणे" हा वेध विचारांचा गाभा आहे आणि हा विचार आता वैश्विक होत जात आहे. या वैश्विकीकरणाच्या प्रवासात वेध परिवाराचे सर्वेसर्वा वेध चे प्रेरणास्त्रोत महाराष्ट्र राज्याचे माजी शिक्षणसचिव आणि सध्याचे मिशन महासंचालक (मनरेगा) आदरणीय नंदकुमार सर यांच्यासोबत वेध चे संघटक श्री. निलेश घुगे आणि त्यांची संपूर्ण टीम शिक्षण क्षेत्रात सातत्याने चार वर्षापासून सक्रीय योगदान देत स्वयंचलित अध्ययन प्रणालीचा प्रचार प्रसार आणि जागरूकता निर्माण करत आहेत. आज महाराष्ट्र राज्य आणि राज्याबाहेरील अनेक शिक्षणप्रेमी वेधसोबत जोडले गेले आहेत. वर्ष २०२३ मध्ये राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था महाराष्ट्र (SCERT) च्या माध्यमातून वेध समूहाने संशोधित केलेले प्रशिक्षण मॉड्यूल "अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन" हे राज्यातील प्रत्येक शिक्षकापर्यंत पोचलेले आहे. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून भविष्यवेधी शिक्षण प्रणाली च्या स्वः पातळीवर करावयाच्या ६ पायऱ्या स्विकारत मुलांना गतीने शिकण्यास प्रेरित करणारी एक साखळी तयार झालेली आहे. मुलांना शिकवायचे कसे हा प्रश्न आता संपलेला आहे आणि एक शाश्वत मार्ग राज्याचा शिक्षण विभागाला मिळालेला आहे. हे सर्व चित्र अत्यंत समाधानकारक आहे आणि आता हे समाधान फक्त वेध समूहापुरते किंवा या प्रक्रियेवर काम करणाऱ्या शिक्षकांपर्यंत सिमीत रहावे असे होऊ नये यासाठी तसेच तळगाळातील शिक्षकांना वैश्विक स्विकृती मिळवून देणे, त्यांच्या कामाचा प्रसार करणे, त्यांच्याकडून प्रेरणा घेत समविचारी स्वयंप्रेरित शिक्षकांची चळवळ उभी करणे यासाठी "वेध सृजन" हे अंक निर्मिती चा निर्णय घेतला आहे.

या अंकाच्या वैशिष्ट्यपूर्ण बाबी खालीलप्रमाणे असणार आहेत.

भविष्यवेधी शिक्षण पध्दतीच्या १,२,३,४,५,आणि ६ या ६ पायऱ्या उपयोगात आणुन परिणाम मिळवणाऱ्या शिक्षकांचे अनुभव अंकाच्या माध्यमातून छापणे आणि प्रसारित करणे.

मूल शिकण्याच्या स्वयंचलीत पध्दतींचा प्रचार प्रसार करणे.

साध्या सोप्या भाषेत परिणामकारक अनुभवांची मांडणी करत इतर शिक्षकांना प्रेरित करणे.

वेधसृजन अंकाच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या घटकांना लेखक होण्यासाठी त्यांचे विचार मांडण्यासाठी हक्काचे व्यासपिठ मिळवून देणे.

लिहिते होण्यासाठी संधीची समानता उपलब्ध करून देणे.

केवळ शिक्षक च नव्हे तर पालक, शालेय विद्यार्थी यांच्यात लेखन प्रेरणा जागृत करणे.

विद्यार्थी, पालक, शिक्षणप्रेमी यांना त्यांचे विचार अनुभव लेखनाची संधी देणे.

राज्य, राज्याबाहेरील शैक्षणिक अनुभवांचे लेखन करणाऱ्या लेखकांना जोडणे आणि लिखित स्वरूपातील अनुभवांची देवाणघेवाण करणे.

लेखन संस्कृती रुजवणे.

अशा अनेक वैशिष्ट्यपूर्ण बाबींचा ध्यास घेत "वेध सृजन" अंक आपणा सर्वांच्या सेवेसाठी तसेच सहयोग आणि सहकार्याने उपलब्ध होत आहे याचा विशेष आनंद होत आहे.

वाचक या अभिनव अंकातील प्रेरक लिखित अनुभवांचा उपयोग आपल्या शैक्षणिक कार्यक्षेत्रत उपयोग करतील आणि मुलांच्या शिकण्यात योगदान देतील असा विश्वास वाटतो.

वेधसृजन अंक शिक्षण क्षेत्रात अतुलनिय योगदानाच्या पातळीवर काम करेल या विश्वासासह आपणा सर्वांना शुभेच्छा! आणि लिहिते होण्यास्तव आग्रह 🙏🏻

**धन्यवाद !**

**सचिव**
**वेधसृजन अंक**

# शुभेच्छा संदेश



**मा. श्री. नंदकुमार**
**मिशन महासंचालक (मनरेगा)**

जगातील मुलांना शिकते करण्यासाठी वेध PLC मागील अनेक वर्षांपासून अतिशय उत्तमरित्या काम करत आहे. मला वाटते जगातील ही एकमेव PLC असेल जी दररोज रात्री zoom च्या माध्यमातून एकत्र येऊन मुलांच्या शिकण्याबाबत चर्चा, विचारविनिमय आणि शैक्षणिक धोरण आखते. मी शिक्षण सचिव असताना राज्यातील अनेक शिक्षकांच्या संपर्कात आलो. त्यातील काही शिक्षक आजही सोबत आहेत आणि मला सांगतांना आनंद वाटतो की, मी सुद्धा त्यांच्यासोबत वेधवर्क टीमच्या चर्चेत सहभागी होत असतो. माझा या सर्वांसोबत शिकण्याचा प्रवास अविरतपणे सुरू आहे. विविध विभागांच्या महत्वपूर्ण पदांवर माझी नियुक्ती असतांना मी शिक्षणासाठी, शिक्षकांसाठी कसे काय वेळ काढू शकतो? असा प्रश्न मला अनेकजण विचारतात. जगातील प्रत्येक मूल शिकण्याच्या प्रक्रियेत माझे स्वतःचे योगदान देता यावे या उदात्त हेतूने मी हे सगळं अथकपणे करतोय आणि करत राहणार आहे. वेधचा प्रवास मागे वळून पाहता एक सहज एकमेकांची भेट व्हावी, शैक्षणिक गप्पा व्हाव्यात या अनुषंगाने सुरू केलेला हा समूह आज एका यशस्वी PLC च्या रूपात राज्य आणि राज्याबाहेर सुद्धा काम करत आहे. प्रशिक्षण क्षेत्रातील वेध चे योगदान अमूल्य आहे. अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून वेधची विचारशैली आणि कार्यपध्दती राज्याच्या प्रत्येक शिक्षकापर्यंत पोहचविणे हे वेधचे सर्वात मोठे यश म्हणावे लागेल आणि याचीच फलश्रुती म्हणजे राज्यातील अनेक शिक्षक भविष्यवेधी शिक्षण प्रक्रियेच्या ६ पायऱ्यांचा उपयोग करत मुलांना शिकते करत आहे. या शिक्षकांचे अनुभव अत्यंत प्रेरणादायी आहेत आणि हे प्रेरणादायी अनुभव आता स्वतंत्र "वेध सृजन" या अंकाच्या माध्यमातून लिखित स्वरूपात उपलब्ध होत आहेत. निलेश घुगे संपादक म्हणून जबाबदारी सांभाळणार असुन प्रियंका अहिरराव, प्रभाकर हिप्परगे, रोहीणी विद्यासागर, अशोक निकाळजे आणि त्यांची संपूर्ण टीम या अंकासाठी जबाबदारी घेत आहेत. वेधसमूहाने घेतलेला निकाळजे हा निर्णय अतिशय कौतुकास्पद आहे. या निमित्ताने वेधस्त्रोत यांनी सर्वप्रथम लिहिते व्हावे आपले जास्तीत जास्त अनुभव लिखित स्वरूपात मांडावेत, रात्रीच्या चर्चेत गप्पाच्या माध्यमातून इतरांचे अनुभव ऐकावेत ते जाणकारांनी पुस्तकाच्या भाषेत लिहून काढावेत. जिल्हा गटातील सदस्यांना लिहिण्यासाठी प्रोत्साहित करावे. हे सर्व करत असतांना एक बाब विचाराधीन असावी ती म्हणजे आपण मांडत असणारे विचार भविष्यातील मूल घडवण्यासाठी प्रेरक असावेत आणि ते अनुभव वाचून सर्वसामान्य शिक्षकाला प्रेरणा मिळावी. तुमच्या लेखनातून Learning to learn हे तत्व रुजावे. शिक्षकांना वर्गपातळीवर भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्यास मदत व्हावी. लेखन परिणामाधारित असावे. या अपेक्षांसह मी "वेध सृजन" या अंकासाठी शुभेच्छा देतो.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेख-विषय | लेखक | पेज क्र. |
|---|---|---|---|
| 1 | आणि अनिकेत बोलू लागला | श्रीमती उज्वला नारायणकर. | 1 |
| 2 | जागतिक दर्जाच्या भविष्यवेधी शिक्षणातून आश्रमशाळेची आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शाळेकडे वाटचाल | श्री विठ्ठल कचरे. | 3 |
| 3 | शिकता -शिकवता, जाणीवा जिवंत ठेवल्यास अभिव्यक्ती आणि सृजनशीलता बहरते | श्री अशोक निकाळजे. | 11 |
| 4 | मुलांचा आनंद | श्रीमती हर्षदा चोपने. | 13 |
| 5 | वेध एक चमत्कार | श्रीमती सुषमा पाटिल. | 15 |
| 6 | वेध प्रकाशन | | 17 |
| 7 | प्रेरणा, प्रयत्न आणि आव्हान; विक्रमी निकालाचा सर्वांनाच अभिमान | डॉ.जयश्री पलांडे. | 19 |
| 8 | भित्रा ससा कसा? तो तर धाडसी हाली जसा | श्रीमती शोभा माने. | 23 |
| 9 | गोष्ट सेल्फीच्या सक्सेसची | श्रीमती शर्मिला खैरनार. | 26 |
| 10 | अभिप्राय-आणि SQ3R ने इतिहास समजू लागला | श्रीमती स्वाती खुडे. | 28 |
| 11 | कविता-आव्हान | श्रीमती आशा करकिले. | 31 |
| 12 | कविता-वेध भविष्य शिक्षण | श्रीमती माधुरी पाटील. | 32 |
| 13 | आव्हानाची किमया पाहूया; जिद्दीने यशाचे शिखर गाठूया | श्री अमोल गुळवे. | 33 |

# आणि अनिकेत बोलू लागला...





• उज्वला कटकदौंड नारायणकर

**नमस्कार,**

मी उज्वला नारायणकर. माझी शाळा पी.एम.श्री. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लवळे, पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यात आहे. माझ्याकडे सध्या इयत्ता पाचवीचा वर्ग आहे. एके दिवशी शनिवारी दुपारी शाळा सुटल्यानंतर शाळेच्या कामानिमित्त मी शाळेत थांबले होते. अनिकेत दप्तर घरी ठेवून शाळेच्या मैदानावर खेळायला आला. त्याच्या हातात पतंग होता. तो कितीतरी वेळ पतंग उडवण्याचा चिकाटीने प्रयत्न करीत होता. वर गेलेला पतंग खाली येत असे. अनिकेत पुन्हा त्याला जिद्दीने वर फेकत असे. त्याने खूप प्रयत्न केले पण हार मानली नाही.आणि सरतेशेवटी त्याचा पतंग हवेवरती छान लहरू लागला. आनंदाचे तरंग त्याच्यासोबत माझ्याही चेहऱ्यावर उमटले. त्याच क्षणी मी ठरवलं आपण पण हार मानायची नाही. अभ्यासात मागे असणारा अनिकेत एक दिवस नक्कीच पुढे जाईल. हा आत्मविश्वास मनात निर्माण झाला.मी त्याचा पतंग उडवताना त्याच्या नकळत लांबून व्हिडिओ काढला. कारण ही गोष्ट माझ्यासाठी खूप प्रेरणादायी होती. अनिकेतकडून मी खूप काही शिकले होते. सोमवारी मी टीव्हीवर व्हिडिओ लावला. आणि सर्व मुलांना दाखवला. सर्वांनी त्याच्या या कामगिरीसाठी कौतुक म्हणून सुंदर टाळ्या वाजवल्या. अनिकेतचा आत्मविश्वास आणि मित्र दोन्ही वृध्दींगत होऊ लागले. त्याचा एकटेपणा आता दूर पळाला होता.



वर्गात नेहमीच अबोल असणारा अनिकेत. पण मी वर्गात नसताना मात्र एका लयीत बेंच हाताने वाजवायचा.त्याला हे कळतही नव्हत की हे त्रासदायक होऊ शकते . अगदी नकळत त्याच्या हातून हे व्हायचं. एकदा जवळ बोलवून त्याला प्रेमाने समजावून सांगितले. तो सुंदर चित्र काढायचा. एकदा स्वतःहून त्याने काढलेले चित्र घेऊन तो माझ्याजवळ आला. " किती सुंदर चित्र काढलय तू अनिकेत!"
अनिकेत हे वाक्य ऐकून खूप सुखावला. "Thank you मॅडम" म्हणून एक सुंदर स्मितहास्य त्याच्या गालावर उमटले. मी तसाच त्याचा एक फोटो काढला. आणि त्या चित्राचाही फोटो काढून सकाळ वर्तमानपत्र Nie (NAtional institute of Engineering ला पाठवला. आणि काय आश्चर्य! सकाळ Nie पुरवणीत अनिकेतचे चित्र आणि त्याचा फोटो प्रसिद्ध झाला. शुक्रवारी सकाळी शाळेत गेल्यावर अनिकेतला जवळ बोलवून त्याच्या हातात सकाळ Nie पेपर दिला. त्याला त्याचे नाव ,

फोटो आणि त्याने काढलेले चित्र दिसले, तेव्हा त्याच्या चेहऱ्यावरचा आनंद अवर्णनीय असा होता. पेपरचे कात्रण आम्ही वर्गातील फ्लॅनेल बोर्डवर लावले. त्यादिवशी सर्वांनी अनिकेतचे कौतुक केले. अनिकेतची आणि सर्वांची गट्टी जमली. तेव्हापासून अनिकेतच्या वागण्यात खूप बदल झाला. तो सतत नावीन्यपूर्ण काहीतरी बनवून मला दाखवू लागला. मी त्याला सतत प्रेरणा दिली. आणि त्याच्या जिज्ञासू वृत्तीचा सन्मान केला. पाठीवर शाबासकीची थाप



मिळू लागली. अनिकेत खुलत गेला. मित्रांशी गट्टी जमल्यामुळे अनिकेत बऱ्याच गोष्टी मित्रांकडून शिकू लागला. विषयमित्र या संकल्पनेचा इथे खूप फायदा झाला.



अभ्यासाचा कंटाळा करणारा अनिकेत आता अभ्यासाकडे वळू लागला. जे काम रागावून कधी शक्य झाले नव्हते ते प्रेमाने , आपुलकीने शक्य होत गेले. त्याचे वाचन सुधारले. आणि एके दिवशी वर्गाची तपासणी करण्यासाठी साहेब आले. त्यांनी विचारले तीस पर्यंत पाढे पाठ असलेल्या मुलांनी हात वर करा. अनिकेतचा हात वर असलेला पाहून मला आश्चर्य वाटले. साहेबांनी नेमके त्यालाच अठ्ठाविसचा पाढा म्हणायला सांगितले.त्याने अस्खलितपणे पाढा म्हणून दाखवला.माझा माझ्यावरच विश्वास बसेनासा झाला. कधी केलं त्याने एवढं. गोष्टीतल्या कासवाप्रमाणे अनिकेतने शर्यत जिंकली होती. त्याने

राखलेल्या सातत्यामुळे तो इथपर्यंत येऊन पोचला होता.

MOLI प्रशिक्षणातून अवगत झालेल्या भविष्यावेधी शिक्षणाच्या सहा पायऱ्या खरोखर अत्यंत उपयुक्त आहेत.





**उज्वला कटकदौंड नारायणकर**
**पी.एम.श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लवळे,**
**तालुका मुळशी, जिल्हा पुणे**
**मो. 9604977698**

# जागतिक दर्जाच्या भविषयवेधी शिक्षणातून आश्रमशाळेची आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शाळेकडे वाटचाल



• श्री. विठ्ठल प्रभाकर कचरे



माझी प्राथमिक आश्रमशाळा वारोळा ता.माजलगाव जि. बीड ही शाळा पूर्वीपासून उपक्रमशील शाळा म्हणून परिसरात ओळखले जाते.

या शाळेत प्रत्येक शनिवारी दप्तरमुक्त शाळा हा नवीन उपक्रम घेऊन मुलांसमोर येत होतो. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा शोध घेण्याचे काम करत होतोच. तसेच आपल्याही आश्रमशाळेचा विद्यार्थी आजच्या स्पर्धेच्या युगात टिकला पाहिजे,यासाठी इयत्ता २री पासून मंथनसारख्या विविध स्पर्धा परीक्षांना मुलांना बसवत होतो.आमच्या शाळेच्या परिसरात इंग्रजी माध्यमांच्या शाळांनी इंग्रजी शिक्षणाचे आकर्षण दाखवून इयत्ता पहिली प्रवेश पात्र विद्यार्थ्यांचे प्रवेश आपल्याकडे कसे करता येतील.यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे आम्हालासुद्धा १ली पासून सेमी सुरू करण्याचा निर्णय घ्यावा लागला. या धर्तीवर शाळेतील प्रत्येक शिक्षक त्याच्या पद्धतीने विद्यार्थ्यांना शिकविण्याचे काम करत होते. विद्यार्थ्यांचे गट करून विद्यार्थ्यांना गटागटांत अभ्यासाला बसवले जात होते. यालाच आम्ही गटकार्यातून शिक्षण म्हणत होतो,परंतु एवढे कष्ट मेहनत घेऊन अध्यापनाचे काम शाळेत चालू होते. पारंपारिक पद्धतीने विद्यार्थ्यांना शिकवण्याचे काम शाळेत चालू होते. काही शिक्षक तोंडाला फेस येईपर्यंत शिकविण्याचे काम करत होते. परंतु शाळेतील 100% मुलं शिकत नव्हती.एवढे करून ही अपेक्षित परिणाम मिळत नव्हते.

## जागतिक दर्जाच्या भविष्यवेधी शिक्षण प्रशिक्षणानंतर शाळेत झालेला बदल



23 जून 2022 ते 26 जून 2022 या कालावधीत VJNT विभागातून निवडक आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकांची मराठवाडा महसूल प्रबोधिनी छत्रपती संभाजीनगर येथे मुख्याध्यापक घटकसंच विकसन कार्यशाळा संपन्न झाली. त्यापूर्वी मी वेध टीम Whats App Group मध्ये होतो. परंतु त्यापुढे जाऊन आपल्याला चांगले काम करायचे असेल आणि त्यांचे चांगले परिणाम मिळवायचे असतील तर वेध वर्क टीम मध्ये काम करावे असे राज्य समन्वयक निलेश घुगे सरांनी सांगितले. आयुष्यात संधी एकदाच मिळते ती संधी आपण ओळखली पाहिजे. आणि मिळालेल्या संधीचे सोने केले पाहिजे. हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून वेध वर्क टीम मध्ये समाविष्ट झालो.

## स्वपातळी पासून कामाला सुरुवात -

2015 ला प्राथमिक आश्रमशाळा वारोळा ता.माजलगाव जि.बीड या शाळेचा मुख्यसेवक म्हणून पदभार स्वीकारला तेव्हापासूनच स्व-पातळीवर काम करत होतो. परंतु जे काम स्व-पातळीवर करत होतो ,त्यात कष्ट जास्त होते.व मिळणारे फलित कमी होते. म्हणजेच एवढे कष्ट मेहनत आपण करतो.परंतु त्याचे अपेक्षित परिणाम मिळत नव्हते. आपण करत असलेल्या कार्याला योग्य दिशा मिळत नव्हती. जेव्हा छत्रपती संभाजीनगरच्या कार्यशाळेत जागतिक दर्जाच्या भविष्यवेधी शिक्षणाबाबत माहिती मिळाली आणि स्व-पातळीवर काम कसे करायचे याबाबत योग्य दिशा मिळाली.तेव्हापासून काम करणे अधिक सोपे झाले. तसेच आता स्व-पातळीवर काम करत असताना हार्डवर्क ऐवजी स्मार्टवर्क होत आहे. केलेल्या कामाचे लागलीच परिणाम मिळत आहेत. आता श्रम निम्मपट झाले असून परिणाम दुप्पट मिळत असून आपण करत असलेल्या कामाचा आनंद तिप्पट मिळत आहे.

## शाळेतील जागतिक दर्जाच्या भविष्यवेधी शिक्षणात सहकार्याचे सहकार्य -

मी वेध परिवारातील वेध वर्कटीम मध्ये काम करत असल्यामुळे आणि जागतिक दर्जाच्या भविष्यवेधी शिक्षण विचार घटकसंच कार्यशाळा छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक येथे झालेल्या TOT मध्ये स्वतःचे प्रशिक्षण सर्वप्रथम झाले.

हे प्रशिक्षण झाल्यावर मी जागतिक दर्जाच्या भविष्यवेधी शिक्षणास मी शिकवीत असलेला गणित विषयापुरते इयत्ता तिसरी व चौथी वर्गात सुरुवात केले.तेव्हा माझ्या शाळेचे सर्व सहकारी मी नेमके काय करत आहे. ते पाहत होते गुरुजी तर वर्गात मुलांना शिकवत नाहीत आणि मुले तर स्वतः शिकत आहेत.वेगवेगळी आव्हाने जोडीदारासोबत,गटातबसून पूर्ण करत आहेत .गुरुजी आव्हान पुर्ण करणाऱ्या मुलासोबत सेल्फी विथ सक्सेस फोटो काढत आहेत. हे नेमके काय करत आहेत.त्याच वर्गाला शिकविणारे इतर विषयाचे शिक्षक, गुरूजी वर्गात कसे प्रयोग करत आहेत याची माहिती मिळवत होते. इयत्ता ३ री व 4थी ची मुले एवढी मग्न झाली की पालक शाळेत प्रत्यक्ष येऊन अथवा भ्रमणध्वनीवर संपर्क करून आम्हाला म्हणत होती की, गुरुजी तुमच्या शाळेत फक्त गणित विषय शिकवीतात का? इतर विषय शिकविले जात नाहीत का? अनिवासी मुले घरी गेल्यावर गणित विषयाचा अभ्यास करतात.इतर विषयाचा अभ्यास का करत नाहीत?



**विषय मित्र**

तेव्हा इतर शिक्षकांच्याही लक्षात आले की आपण एवढे शिकवतो तरी मुले आपण शिकवीत असलेल्या विषयाचा अभ्यास करत नाहीत फक्त गणिताचा अभ्यास करत आहेत तेव्हा काही शिक्षक म्हणाले गुरुजी आम्हालाही जागतिक दर्जाचे भविष्यवेधी शिक्षण काय आहे ?ते सांगा आम्हीही या पद्धतीने काम करू आम्हाला ही याच पद्धतीने काम करायचे आहे.तेव्हा त्यांना जागतिक दर्जाच्या भविष्यवेधी शिक्षणाविषयी माहिती सांगितली. तेव्हा मी त्यांना म्हणालो तुमचेही जागतिक दर्जाचे भविष्यवेधी शिक्षण कसे असते. याबाबत प्रशिक्षण होणार आहे तेव्हा तुम्ही शिकून घ्या तेव्हा त्यातील काही शिक्षक म्हणाले आमचे जेव्हा प्रशिक्षण होईल तेव्हा शिकवूच परंतु आता तुम्ही आम्हाला सांगा. शिक्षकांची काम करण्याची उत्सुकता पाहून त्यांना जागतिक दर्जाचे भविष्य शिक्षण हे वेध परिवाराने तयार केलेले पुस्तक सुरुवातीला प्रत्येकाला वाचायला दिले. ते पुस्तक वाचल्यानंतर आपणाला काय समजले यावर चर्चा करू असे ठरले. ठरल्याप्रमाणे सर्व शिक्षकांनी पुस्तक वाचून काढले आणि काही शिक्षकांनी प्रशिक्षणाची वाट न पाहता जागतिक दर्जाच्या भविष्यावेधी शिक्षणास शिक्षकांनी सुरुवात केली.व प्रत्यक्ष परिणाम मिळत गेले. अशाप्रकारे शाळेतील सहकार्याचे सहकार्य मिळत गेले आता शाळेतील सर्व शिक्षकांचे जागतिक दर्जाच्या भविष्यावेधी शिक्षण विचार प्रशिक्षण झाले असून त्याच्यात व माझ्यात आंतरक्रिया होत असून प्रत्यक्षात या सहा पायऱ्यावर काम चालु असून चांगले भन्नाट परिणाम मिळत आहेत.

## मुख्याध्यापक म्हणून Roger’s Curve वर काम -

Roger’s Curve नुसार प्रवर्तक (Innovators) चे प्रमाण 2.5%Early Adopters चे प्रमाण 13.5% शीघ्रबहुसंख्यक (Early Majority) चे प्रमाण 34% विलंब बहुसंख्यक(Late Majority) चे प्रमाण 34%व मागे राहणारे Laggards चे प्रमाण16% असा एकूण 100% समूह काम करत असतो.

Roger’s Curve नुसार माझ्या शाळेत काम करत असताना योगायोगाने म्हणावे लागेल जो प्रवर्तक (Innovators) आहे त्या शिक्षकांचे सर्वप्रथम जागतिक दर्जाचे भविष्यवेधी प्रशिक्षण 13 ऑक्टोबर 2022 ते 17 ऑक्टोबर 2022 या कालावधीत झाले आणि लागलीच त्या शिक्षकांनी शाळेत प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली.

Early Adopters हा समूहाचा प्रकार येतो आणि या प्रकारात माझ्या शाळेतील चार शिक्षक येतात आणि त्यांचे मी प्रशिक्षण 25 नोव्हेंबर 2022 ते 1 डिसेंबर 2022 या कालावधीत झाल्यामुळे ते ही लागलीच कामाला लागले म्हणजे सुरुवातीच्या एक व नंतरचे चार असे एकूण पाच शिक्षक कामाला लागले.आता राहिलेले तीन शिक्षक हे Early Majority मध्ये येतात जेव्हा पहिले पाच शिक्षक आपआपल्या वर्गात आपण शिकवीत असलेल्या विषयात कमी श्रमात चांगले परिणाम मिळत आहेत हे लक्षात आले असता राहिलेले तीन शिक्षकांनी ही त्यांचे काम पाहून कामाला लागले. आता शाळेतील सर्व शिक्षकांचे जागतिक दर्जाचे भविष्यवेधी प्रशिक्षण झाले असून प्रत्येक शिक्षक आता आपआपल्या विषयात भविष्यवेधीच्या सहा पायऱ्यावर काम करत असून त्यांचे चांगले परिणाम त्यांना मिळत आहेत माझ्या शाळेत Late Majority (विलंब बहुसंख्या) आणि Laggards यावर काम करण्याची वेळ माझ्यावर आली नाही.

## सहा पायऱ्या नुसार शाळेतील काम -

शाळेतील सर्व सहकाऱ्यांचे जागतिक दर्जाचे भविष्यवेधी शिक्षण विचार प्रशिक्षण झाले व शिक्षक व माझ्यात खऱ्या अर्थाने आंतरक्रिया होण्यास सुरुवात झाली. आता शाळेतील प्रत्येक शिक्षक विषयनिहाय भविष्यवेधीच्या सहा पायऱ्यांवर प्रत्यक्ष काम करत आहेत व त्याचे भन्नाट परिणाम मिळवत आहेत.

**1) मुलांना स्वतः शिकण्यास प्रेरित करणे :-** मूल स्वतः शिकू शकते.यावर आमच्या शाळेतील शिक्षकांचा विश्वास बसत नव्हता. परंतु जेव्हा आमच्या शाळेचे सर्व शिक्षकांचे जागतिक दर्जाचे भविष्यवेधी शिक्षण विचार प्रशिक्षण दिनांक 28 नोव्हेंबर ते 1 डिसेंबर 2022 या कालावधीमध्ये छत्रपती संभाजीनगर येथे झाले.2 डिसेंबरला प्रशिक्षण घेऊन सर्व शिक्षक शाळेत आले व आपआपल्या वर्गात जाऊन आपण शिकवीत असलेल्या विषयाची आव्हान मुलांना दिले व काही मुलांनी लागलीच ते पूर्ण केले असता त्यांनाही विश्वास बसला की आपल्याही VJNT आश्रमशाळेतील मुल स्वतः शिकू शकते.शिक्षकांनी आपल्या विषयनिहाय अध्ययन स्तर निश्चिती करून विद्यार्थ्यांच्या ASER, NAS व PISA अध्ययन पातळीचा शोध घेऊन त्यांच्या आवडी लक्षात घेऊन त्यांच्या अध्ययन पातळीनुसार विशेष आव्हाने देण्यास सुरुवात केली. मुलांना त्यांच्या आवडीनुसार काम मिळत होते. त्यामुळे मुले स्वतः शिकत आहेत हे शिक्षकांच्या लक्षात आले. शाळेतील शिक्षक हे सुलभकाचे काम करत असून विद्यार्थ्यांचे शिक्षक हे आता मित्र बनले आहेत तसेच वेळेची मर्यादा राहिली नाही. मुले कुठेही बसून जोडीने ग्रुपने स्वतः शिकत आहेत आपण डोळ्यांनी पाहिले तर शाळेत मुले गोंधळ करताना दिसतात.परंतु प्रत्यक्ष जाऊन डोक्याने पाहिले तर मुले गोंधळ करत नाहीत. तर अभ्यासात मग्न आहेत न आलेल्या बाबी एकमेकांना विचारत आहेत. वेळ आली तर शिक्षकांची मदत घेत आहेत परंतु स्वतः शिकत आहेत. त्याचे चांगले परिणाम मिळत आहेत.कोणते शिक्षक रजेवर असतील अथवा प्रशिक्षणसाठी बाहेरगावी गेले असतील तरी त्यांच्या वर्गातील विद्यार्थ्यांचे शिकणे थांबत नाही शिक्षकाविना ही विद्यार्थी स्वतः शिकू लागले आहेत. यातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढत आहे.त्याच्यात क्रिटिकल थिंकिंग,क्रिएटिव्ह थिंकिंग स्किल निर्माण झालेल्या दिसतात.



**2) मुलांना शिकण्यास आव्हान देणे.**

जेव्हा आमच्या आश्रमशाळेतील शिक्षकांचे जागतिक दर्जाचे भविष्यवेधी शिक्षण प्रशिक्षण झाले. आणि त्यांना मुले स्वतः शिकू शकतात असा विश्वास आला. तेव्हा त्यांनी शाळेतआपण शिकवत असलेल्या विषयातील घटकाला अनुसरून आव्हाने देणे सुरू केले. परिसरातील असो, गाव पातळीवरील असो , दृश्य,अदृश्य अनुभवातील असो, किंवा पाठावर प्रश्न तयार करण्याची आव्हाने असो विद्यार्थी आव्हाने पूर्ण करायला लागली. याचा फायदा असा झाला शिक्षकांचे श्रम कमी झाले

असून विद्यार्थ्यांचे शिकणे गतीने व्हायला लागले आहे. आता शिक्षकाचे श्रम निमपट झाले असून परिणाम दुप्पट मिळत आहेत व आनंद तिप्पट मिळत आहे.आता तर मुलांना आव्हान पूर्ण करण्याची इतकी सवय झाली की रोज घरी जाण्यापूर्वी विचारतात आजचे आव्हान काय आहेत.आमचे शिक्षक उपस्थित नसले तरी संबंधित विषयाचे विषय मित्र आव्हान देतात. आणि आव्हाने तपासण्याचे कार्य सुद्धा करतात असे भन्नाट परिणाम डोळ्यासमोर येत आहेत. हे सर्व शक्य झाले भविष्यवेधी शिक्षणामुळे गुगल सर्च करून विविध देशाच्या भाषा विद्यार्थी स्वतः शिकत आहे.या पायरीमधून क्रिटिकल थिंकिंग,क्रिएटिव्ह थिंकिंग या स्किल विद्यार्थ्यांमध्ये विकसित होत असताना दिसत आहेत.

### 3) लर्निंग इंटरवेंशन -

खरंच मित्रांनो लर्निंग इंटरवेशन या पायरीने शिक्षकाचे काम कमी तर झालेच परंतु परिणाम अधिक मिळत आहेत. आणि विद्यार्थ्यांचे शिकणे सुद्धा खूप गतीने होताना प्रत्यक्षात दिसत आहे. आपण खूप शिकवतो म्हणजे मुलं शिकत असते असं नाही. त्या शिकण्याच्या प्रक्रियेत मुलं शिक्षकापेक्षा आपले मित्र आपले सहकारी आपल्या जवळच्या व्यक्ती यांच्या माध्यमातून ते अधिक शिकत असतात.

लर्निंग इंटरवेंशन ही प्रक्रिया राबविताना विद्यार्थ्यांना पियर मध्ये काम करण्याची सवय लावायला थोडा वेळ लागला. परंतु हळूहळू त्यांना पियरमध्ये काम करायला आवड निर्माण झाली.वर्गातील जोडी,शाळेतील जोडी, घराजवळ असलेल्या मुलांची जोडी गरजेनुसार जोड्या तयार करण्यात आल्या. आवश्यकतेनुसार जोड्या बदलत जातोत. विषय मित्र संकल्पनेमुळे विद्यार्थी अनेक बाबतीत तरबेज होत आहेत.ज्यांना जे जमत नव्हतं ते आपल्या मित्राकडून शिक्षका पेक्षा अधिक गतीने शिकत आहेत.मित्र हा त्याच्याजवळ अधिक जास्त काळ जवळ राहू शकतो.मित्रांसोबत अनेक बाबी शेअर करू शकतात त्यांना कसली ही एकमेकांची भीती वाटत नाही.

लर्निंग इन्टरवेंशनमुळे उपस्थितीचे प्रमाण वाढले आहे. शाळेविषयी मुलांमध्ये आवड निर्माण झाली. विद्यार्थी चांगल्या पद्धतीने व्यक्त व्हायला लागले. विद्यार्थ्यांत धाडस निर्माण झाले असून विद्यार्थी जबाबदारीने काम करायला लागले आहेत.ज्याला ज्यामध्ये आवड आहे त्या त्या गोष्टी इतरामध्ये निर्माण करण्याचे कार्य विषय मित्र करू लागले आता तर सांस्कृतिक कार्यक्रमाची तयारी असो ,वा खेळाची तयारी असो ,परिपाठ असो या सर्व बाबी विद्यार्थी स्वतः ग्रुप मध्ये करत आहेत.

यातून कोलाब्रेशन,कम्युनिकेशन, कंपेशन आणि कॉन्फिडन्स हे स्किल सुद्धा विकसित होताना दिसत आहेत.

### 4) तंत्रज्ञानाचा वापर -

भविष्यवेधी शिक्षणाची चौथी पायरी म्हणजे शिकण्यात तंत्रज्ञानाचा उपयोग.आधी आमच्या शाळेचे शिक्षक शिकवण्यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग करायचे स्मार्ट टीव्ही असो, मोबाईल असो, लॅपटॉप असो, प्रोजेक्टर असो परंतु आता मात्र आम्ही शिकवण्याच्या व शिकण्याच्या पद्धतीत बदल केला आहे विद्यार्थी शिकण्यासाठी तंत्रज्ञानाचा साधनांचा उपयोग स्वतः करीत आहेत.

शाळेतील विद्यार्थ्यांचे वर्गनिहाय व्हाट्सअप ग्रुप तयार केलेले असून मुलांना रोज व्हाट्सअप ग्रुप वर आव्हाने दिले जातात.ती आव्हाने घरी गेल्यावर तंत्रज्ञानाच्या साह्याने पूर्ण करतात. तर निवासी विद्यार्थी स्मार्ट टीव्ही तसेच इंटरनेटचा वापर करून दिलेले आव्हाने पूर्ण करताना दिसतात.

खरंच मित्रांनो एकविसाव्या शतकात अशा गोष्टींचा उपयोग शिकण्यात करणे खूप आवश्यक झाले आहे. आपल्याला विद्यार्थ्यात एकविसाव्या शतकातील कौशल्य रुजवायची असेल तर ही पायरी फार महत्त्वाचे वरदान ठरत आहे. तंत्रस्नेही शिक्षकाप्रमाणेच तंत्रस्नेही विद्यार्थी घडणे हे सुद्धा काळाची गरज आहे तंत्रज्ञानाचा वापर कसा करायचा हे शिक्षकापेक्षा विद्यार्थी अधिक चांगल्या पद्धतीने करू शकतात यूट्यूब सारखे अप्लिकेशन्स गुगल असो, दीक्षा ॲप असो अशी अनेक प्रकारची ॲप्लिकेशन्स आहेत की ज्यामुळे विद्यार्थी त्या माध्यमातून शिकू शकतो.सामान्य ज्ञान असो जगातील इतर भाषांचा अभ्यास असो या सर्व बाबी यातून विद्यार्थी स्वतः शिकू शकतात ज्याप्रमाणे शिक्षक स्वतः अपडेट राहण्याचा प्रयत्न करतो त्याच प्रमाणे विद्यार्थ्यांनी सुद्धा बदलत्या परिस्थितीनुसार अपडेट व्हायला शिकलच पाहिजे.

### 5) मुलांच्या जिज्ञासू वृत्तीचा सन्मान करणे -

मुलांच्या जिज्ञासू वृत्तीचा सन्मान करणे म्हणजे काय ? हे आधी आपल्याला कळलं पाहिजे मुलांना अनेक प्रश्न पडतात. ते खूप प्रश्न विचारत असतात आपण त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देणे म्हणजे त्यांच्या जिज्ञासू वृत्तीचा सन्मान करणे असे नव्हे त्यांना निर्माण झालेली प्रश्न आणि त्या प्रश्नांची उत्तरं त्यांनीच कसे मिळवायचे याकरिता शिक्षक फक्त सुलभक म्हणून काम करतो. त्यांच्या प्रश्नांची उत्तरे त्यांनीच मिळवावी.यासाठी शिक्षकाने फक्त त्यांच्यासोबत सुलभक म्हणून राहायचं. म्हणजे त्यांच्या जिज्ञासू वृत्तीचा सन्मान करणे आपल्याला त्यांची जिज्ञासू वृत्ती शमवायची नाही. तर त्याच्या जिज्ञासू वृत्तीचा सन्मान करायचा आहे.

माझ्या शाळेतील विद्यार्थ्यांनी काल काय केले ,घरी कोणता कार्यक्रम होता याची विचारपूस शिक्षक करतात विद्यार्थी काही नवनवीन गोष्टी स्वतः शिकत आहे हे? हे जाणून घेतात व त्यांच्या जिज्ञासू वृत्तीचा सन्मान करतात.

क्रिएटिव थिंकिंग, क्रिटिकल थिंकिंग,कॉन्फिडन्स, कम्युनिकेशन, कलाब्रेशन ही सहा स्किल्स यातून विकसित झाल्याचे दिसून येते.

### 6.मुलांनी स्वतः शिकण्याची अध्ययन गती तिप्पट करणे -

वरील पाच पायऱ्यावर काम केले की विद्यार्थ्यांची स्वतः शिकण्याची अध्ययन गती तिप्पट होते.ही सुद्धा खूप महत्त्वाची बाब आहे. ज्या वेळेस विद्यार्थ्यांचा पाठ्यक्रम अभ्यासक्रम हा एक तृतीयांश वेळेत पूर्ण होतो. आणि त्या नंतर उरलेल्या वेळ ते इतर बाबी शिकण्यासाठी वापर करतात.आमच्या शाळेतील ज्या विषयांचा पाठ्यक्रम पूर्ण झाला आहे ते शिक्षक विद्यार्थ्यांना नवनवीन कौशल्य पुढच्या वर्गातील अभ्यासक्रम विद्यार्थ्याला जे जे जमते ते त्याला पुढील बाबी शिकण्यासाठी सांगतात. विद्यार्थ्यांना गतीने शिकण्या करता त्यांच्या मध्ये लर्निंग स्किल विकसित होणे अपेक्षित आहे आता विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी शिकायचं आहे लर्निंग टू लर्न या ॲप्रोचने आपल्याला जायचं आहे.एक तृतीयांश वेळात पाठ्यक्रम पूर्ण केल्यावर जो दोन तृतीयांश वेळ उरतो यामध्ये आपल्याला एकविसाव्या शतकातील कौशल्य विद्यार्थ्यात विकसित करायची आहे आणि या सर्व गोष्टींचा विचार करून आपल्याला आपले विद्यार्थी पिसा पातळीचे कसे तयार होतील.यासाठीची कृती आम्ही करतो.आमच्या आश्रमशाळेत इयत्ता चौथी वर्गाचा पाठ्यक्रम पूर्ण झालेला असून उरलेल्या वेळेत मुले जपानी भाषा स्वतः शिकत आहेत. आम्ही जागतिक दर्जाच्या भविष्यवेधी शिक्षणाच्या सहा पायऱ्यावर काम करत असून एकविसाव्या शतकातील सहा कौशल्य विकसित करून हावर्ड गार्डनच्या नऊ

बुद्धिमत्ताचा विकास करून आपण जागतिक दर्जाच्या भविष्यवेधी शिक्षणाचे चार आयाम पूर्ण करू शकतो.

आपण करत असलेले कार्य हे आपल्यासाठी व इतरांसाठी नक्कीच प्रेरणादायी असणार आहे त्याकरिता आपण करत असलेले कार्य फेसबुक, युट्युब, व्हाट्सअप व्दारे अशा माध्यमातून आपल्याला प्रसिद्ध व प्रसारित करणे सुद्धा अपेक्षित आहे.जेणेकरून यातून इतरांना दिशा मिळेल. आणि जागतिक दर्जाच्या भविष्यवेधी शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार होईल. हे कार्य आपल्याला केवळ स्थानिक पातळीपर्यंत मर्यादित ठेवायचं नसून त्याला आपल्याला जागतिक स्तरावर पोहोचायचा आहे. हे शक्य आहे ते फक्त जागतिक दर्जाच्या भविष्य वेधी शिक्षणामुळे.

### शिक्षकांचे काम कमी आणि परिणाम जास्त मिळण्यासाठी होणारी मदत -

माझ्या शाळेतील सर्व शिक्षकांचे भविष्यवेधीचे प्रशिक्षण झाले असून प्रत्येक शिक्षकांना आता मूल स्वतः शिकू शकते याचा विश्वास आला आहे .तसेच मुले त्यांच्या गतीने शिकत असून शिक्षकांनी दिलेले आव्हाने स्वीकारत आहेत.त्यामुळे प्रत्येक मूल स्वतः शिकून शिकत असून शिक्षक त्यांना शिकवण्यासाठी सुलभकांच्या भूमिकेत आहेत. शिक्षक भविष्यवेधी शिक्षणाच्या सहा पायऱ्यावर काम करत असून रोज विद्यार्थ्यांना त्यांच्या अध्ययन पातळीनुसार गतीनुसार आव्हाने देतात.मुले ती पूर्ण करतात. आव्हान पूर्ण करणाऱ्या मुलांसोबत सेल्फी विथ सक्सेस फोटो काढून आनंद साजरा करतात तसेच माझा ही सेल्फी विथ सक्सेस फोटो माझ्या शिक्षका सोबत यावा म्हणून विद्यार्थी विषय निहाय दिलेले आव्हान पूर्ण करून शिक्षका सोबत सेल्फी विथ सक्सेस फोटो काढतात.आपण एवढे शिकूनहीआपल्या वर्गातील शंभर टक्के विद्यार्थी शंभर टक्के शिकली नाहीत.आणि आपण न शिकविता त्याच्या गतीनुसार शिकत आहेत.तसेच वेळेची मर्यादा राहिली नाही.तसेच आपण आपला शिकवत असलेल्या इयत्तेचा पाठ्यक्रम शिकविण्यासाठी एक वर्ष लावतो तो आता तीन महिन्यात पूर्ण होत आहे.त्यामुळे शिक्षकांचे श्रम निमपट झाले.असून परिणाम दुप्पट मिळत आहेत. व त्याचा आनंद तिप्पट झालेला आहे. आता शिक्षक हार्डवर्क करत नाही तर स्मार्ट वर्क करतआहेत.ते स्वतःम्हणतात आता पर्यंत आम्ही जे काम पारंपारिक पद्धतीने करत होतो.ती फक्त गाढव मेहनत होती.आता आम्हाला जागतिक दर्जाच्या भविष्यवेधी शिक्षणामुळे नवीन दिशा मिळाली असून त्यांचेभन्नाट परिणाम शाळेत विद्यार्थ्यात दिसत आहेत.

### अध्ययन स्तर निश्चिती केल्यामुळे एका स्तरातून पुढच्या स्तरावर मुले पुढे जाताना -

शाळेतील सर्व शिक्षकांचे जागतिक दर्जाचे भविष्यवेधी शिक्षण विचार प्रशिक्षण झाले. असून सर्व शिक्षकांना मुले स्वतः शिकू शकतात.याचा विश्वास आला असून प्रत्येक शिक्षकांनी सुरुवातीला ते शिकवत असलेल्या विषयाची अध्ययनस्तर निश्चिती केली. असून त्यानुसार विद्यार्थ्यांचे ASER, NAS व PISA या ३ पातळीवर वर्गीकरण करून दर 15 दिवसांनी तो विद्यार्थी कोणत्या स्तरावरआहे त्याच्यात किती सुधारणा झाली.अथवा कसे परिणाम मिळत आहेत याबाबत शिक्षक आढावा घेतआहेत.जे विद्यार्थी मागे राहत आहेत त्यांना पिअर लर्निंग, ग्रुप लर्निंग, विषय मित्र, एकेरी आव्हान, दुहेरी आव्हान, गल्लीतील जोडी, वर्गातील जोडी, शाळेतील जोडी ,वस्तीगृहातील जोडी तयार करून त्याच्या अध्ययन पातळी नुसार गतीनुसार जोड्या लावून त्यांना शिकण्यासाठी मदत करत आहेत. जे विद्यार्थी एक एक आव्हान पूर्ण करून पुढे जात आहे. त्यांना विविध प्रकारची त्यांच्या अध्ययन गतीनुसार आव्हाने दिले जातात. त्यामुळे कोणत्या स्तरावर कोणता विद्यार्थी आहे.

**मुलांच्या शिकण्यात जाणवत असणारे बदल -**

या वर्षी 15 जून 2022 ला शाळा प्रत्यक्ष सुरू झाल्या 15 जून 2022 ते 1 डिसेंबर 2022 असा साडे पाच महिन्याच्या कालावधीत इयत्ता पहिली वर्गातील अरविंद विठ्ठल पवार याला आम्ही एक ते शंभर पर्यंत अंक शिकू शकलो नाही परंतु दोन डिसेंबरलाआमच्या शाळेतील श्रीमती प्रधान बाई यांचे जागतिक दर्जाचे भविष्यवेधी शिक्षण विचार प्रशिक्षण झाले त्यांनी शाळेत आल्यावर आपल्या पहिलीच्या वर्गातील मुलांची अध्ययन स्तर निश्चिती केली. व त्यानुसार विद्यार्थ्यांचे अध्ययन पातळी नुसार वर्गीकरण केले.असता त्याच्यावर्गातील अरविंद विठ्ठल पवार या विद्यार्थ्याला त्या साडे पाच महिन्यात एक ते शंभर अंक शिकवणी तरी तो शिकला नाही.म्हणून मॅडमने त्याची जोडी त्यांच्या आवडत्या मित्रासोबत सिद्धार्थ मोहन पवार या मित्रा सोबत लावून अरविंद ला एक ते शंभर पर्यंत अंक शिकण्याचे काम सिद्धार्थ कडे लावले .असता फक्त दोन दिवसात अरविंद सिद्धार्थ कडून एक ते  शंभर अंक शिकला.आता तोच अरविंद बेरीज वजाबाकीचे भन्नाट उदाहरणे सोडवत आहे.हा जागतिक दर्जाच्या भविष्यवेधी शिक्षणाचा परिणाम आहे.अशी अनेक उदाहरणे आपणास सांगता येतील असे परिणाम शाळेत विद्यार्थ्यात दिसत आहेत.

**पुढील नियोजन -**

15 मार्च 2022 पर्यंत शाळेचे FLNवरील काम पूर्ण झालेले आहे.आता  भविष्यवेधी शिक्षणाच्या सहा पायऱ्यांचा साह्याने विद्यार्थी भन्नाट गतीने कशी शिकतील आणि भन्नाट गतीने स्वतः शिकून  पाठ्यक्रम मुले स्वतः कशी पूर्ण करतील .यासाठी भविष्यवेधी शिक्षण पद्धतीच्या सहा पायऱ्यावर प्रामुख्याने काम करून त्यातून परिणाम मिळवणार आहोत.कोणतीही नवीन गोष्ट शिकण्यातून आपल्याला कसे अधिकचे चांगले परिणाम मिळतील याचा शोध घेऊन भविष्यवेधी शिक्षणाच्या चार आयामानुसार काम करायचे आहे.त्यासाठी राहिलेल्या वेळेचा उपयोग इतर राष्ट्राचे इतर राष्ट्राची शिक्षण पद्धती विविध स्पर्धा परीक्षेची तयारी इतर राष्ट्राच्या भाषा शिकणे या साठीचे नियोजन करायचे केले असून PISA Ready मुल असे तयार करायचे की ते भविष्यासाठी तयार असेल.





**श्री. विठ्ठल प्रभाकर कचरे**
प्राथमिक आश्रमशाळा वारोळा,
ता.माजलगाव जि.बीड

# शिकता - शिकवता, जाणीवा जीवंत ठेवल्यास अभिव्यक्ती आणि सृजनशिलता बहरते...

• अशोक निकाळजे



तारीख होती १३ ऑक्टोबर २०२३ . इ. १ ली च्या मुलांसाठी मी त्यांच्या भावविश्वातील मक्याच्या कणसाचे चित्र फळ्यावर काढले आणि मुलांना म्हणालो की, " बाळांनो तुम्हाला फळ्यावर एक चित्र दिसत आहे. ते कशाचे आहे ? ते प्रथम ठरवा.उत्तर तोंडी सांगण्या ऐवजी फळ्यावर लिहा."

मुलेही कमालीची. त्यांनी उत्तम प्रतिसाद दिला. मग काय झाली सुरुवात.

सुरुवात केली आर्यनने. त्याने लिहिले कणीस. त्याचे होते न होते तोच सिद्दी, अर्चना, गीता , कार्तिक, कृष्णा, रोशणी , अर्जुन,अरोही मुळे , आरुष , आयुष , रोहित, भाग्यश्री, प्रतिक्षा, साक्षी , माऊली, आरोही हातागळे इ. जवळ जवळ १७ते १८ मुलांचे हात , उत्तर लिहिण्यासाठी वर होते.पुष्कळ मुलांची हात वर आहेत. हे मी जाणले आणि त्याचा फायदा घ्यायचे ठरवले.

आर्यनचे उत्तर बरोबर होते. तरीही मी त्याला काहीच प्रतिसाद न देता बसण्याचा इशारा केला (मी मुलांना शाबासकी देण्यात कंजुशी करत नाही.) आणि पुढचा नंबर अर्जुनचा घेतला. अर्जुनने 'आननस ' असे उत्तर लिहिले. मी त्यालाही कोणताच प्रतिसाद दिला नाही. मग आली भाग्यश्री. तिने लिहिले ' कारले.' मी नंतरच्या मुलाला, बोलवण्याचे काम चालूच ठेवले . मग आली अर्चना. तिने लिहिले ' सिताफळ .' गायत्रीने लिहिली 'पपई.' कार्तिकने आपले उत्तर नोंदवले ' कमळ. ' मग नंबर आला सिध्दीचा . तिला लिहायचे होते गिफ्ट पण तिने लिहिले ' गिफट '. तोपर्यंत वेळ आली आकांक्षाची. तिने आभाळ ऐवजी आभळ असे लिहिले. मग आला रोहित. त्याने लिहिले, 'ढग.' तो पर्यंत कृष्णाचा नंबर लागला. त्याचे उत्तर होते, ' सरपन.' कृष्णाचे संपते न संपते तोच आरोही लगेच तयार होती. तिने लिहिले ' पान.'

मी मात्र काहीच प्रतिसाद न देता एका नंतर एक उत्तरे घेत होतो. मुलांना माझा आंदाज येत नव्हता, पण त्याची पर्वा न करता ते आपले मन फळ्यावर मोकळे करत होते. मला मात्र १९९५ साली बंद झालेले बोनस मिळत असल्याचा आनंद झला होता.

मग शांत स्वभावाच्या प्रतिक्षाने उत्तर लिहिले हरण. नंतर आरुषने उत्तर लिहिले, ' फूल.' पुढे बारी होती आयुषची. त्याने लिहिले, ' गाजर.'

तेवढ्यात मधेच अर्चना उभी राहून म्हणाली, " सर मला अजून एक उत्तर आलं." मला माहित आहे. अर्चना इतरांपेक्षा फार वेगळा विचार करते. मी लगेलच तिला संधी दिली आणि अर्चनाने संधीचे सोने केले. तिने लिहिलेले उत्तर अफलातून होते. उत्तर होते, 'कानातले.'

बऱ्याचे उशीराने साक्षीने बोट वर करत आपले उत्तर ' कळी ' हे लिहिले, आणि मीही मागे नाही हे सिद्ध केले. मग पुन्हा भाग्यश्रीने हात वर केला. तिने उत्तर लिहिले ' फणस. ' पुन्हा एकदा सिद्वीने बोट वर केले आणि उत्तर लिहिले 'केळ.' एवढ्या वेळात माऊलीची ट्युब पेटली.

त्याचे उत्तर होते 'मका.' लगेच अर्जुनलाही पुन्हा उत्तर देण्याची घाई झाली. तो ही फार चतुर आणि चपखल मुलगा आहे. त्याने उत्तर लिहिले, 'आगुर.' (लिहायचे होते अंगुर.) आणि शेवट केला अरोही हातागळेने. तिचे उत्तर होते ' दाळ.'

मुलांनी कमाल केली होती. मी काढलेले चित्र हुबेहुब नव्हते. पण अपेक्षित उत्तर मिळेल एवढ्या कामाचे होते. वर्गातील २१ मुलांपैकी १७ ते १८ जणांनी त्यांना त्या चित्राबद्दल जे जे वाटले ते लिहिले. खरंतर कणीस आणि मका हे उत्तर घेऊन मी बाकी मुलांना चूकीचे ठरवले असते तर या मुलांची ' वाटणे ' ची वाट कदाचित बंद झाली असती. वाटणे आणि ते व्यक्त करणे ह्या अभिव्यक्तीसाठी पुरक ठरणाऱ्या गोष्टी आहेत. असे मला वाटते.

जेंव्हा एकाच उत्तरासाठी अनेकांची बोटे वर झाली तेंव्हाच मी विचार केला की , माझ्या चित्रा बद्दल बहुतेक प्रत्येकाचे मत वेगळे असेल काय ? जर ते काढून घ्याचे असेल तर कोणतेच उत्तर बरोबर किंवा चूक ठरवायचे नाही. प्रत्येकाचे उत्तर वेगळे आले तर आनंदच आहे. एक दोन मुलांनी असंबंध उत्तरे लिहिली. बाकी सर्वांनी चित्राला समर्पक, त्यांच्या मनाला भावलेली उत्तरे लिहिली. हा एक सर्जनशिल विचार आहे .



बहुतेक जणांनी त्या चित्रामधे प्रतिचित्र शोधण्याचा प्रयत्न केला. पण अर्चनाच्या उत्तराने तिच्या भाषिक बुद्धीमत्तेची झलक दाखवली. तिला ते चित्र महिला कानात घालतात त्या कर्णफुलाप्रमाणे (दागिण्या) भासले असावे. म्हणून ती त्या चित्राला कानातले म्हणाली. प्रत्येकाने त्यांच्या पुर्वानुभवाशी ह्या नव्या अनुभवाची तुलना केली असणार. त्यावर त्यांचे चिंतन, मनन झाले असणार. त्यावरून त्यांनी निष्कर्ष काढला असणार. खरंतर मुलांना इमॅजिन करायला फार आवडतं. त्यातून त्यांचे शिकणे मजेदार होते. हे चित्र काढण्यामागे, मुलांना मुळाक्षरे आणि त्यांच्या स्वरचिन्हाचे उपयोजन अर्थात ध्वनी लिपीबद्द करता येते किंवा नाही, हे पाहाणे, हा हेतू होता. परंतु मुलांचा प्रतिसाद पाहुन वेगळा विचार आला आणि मुलं अभिव्यक्त झाली. जर माझ्या कडून मुलांचे हात वर करणे ही बाब सहज घेण्यात आली असती तर मला हिच क्षमता तपासण्यासाठी प्रती विद्यार्थी एक चित्र काढावे लागले असते. त्यासाठी ना एवढा वेळ होता ना तेवढा संयम. बाकी मुले कंटाळली असती ते वेगळेच. यामधे मात्र हुशार मुले पुन्हा पुन्हा उत्तरे देत होती. गती कमी असलेल्या मुलांनाही विचार करायला भरपूर वेळ मिळाला.

**अशोक निकाळजे**
**जि.प. प्राथमिक शाळा आगारनांदूर,**
**ता-गेवराई, जि-बीड**

# मुलांचा आनंद



• **हर्षदा चोपने**

खरंतर शिक्षक म्हणून सगळेच जण आपापल्या वर्गात, आपापल्या शाळेत काम करत असतात. मी पण प्रवाहाबरोबर कामच करत होते, हवं तर राबत होते म्हणायला हरकत नाही. पण मागील तीन-चार वर्षापासून मला माझ्या काम करण्याच्या पद्धतीत बदल झाला आहे. प्रामुख्याने जाणवायला लागले, बदल जाणवायला लागले म्हणजेच काय तर माझ्या मुलांमध्ये मला तसं परिवर्तन दिसायला लागले .आधी मी फक्त शिकवायचे आणि मुलं ऐकायचे अशा पद्धतीचे मी काम करत होते. पण जेव्हापासून मी भविष्यवेधीच्या सहा पायऱ्यांप्रमाणे काम करायला लागली तेव्हा जुन्याच गोष्टी नवीन पद्धतीने माझी मुलं खूप छान पद्धतीने शिकू लागले. मुलांमध्ये कॉन्फिडन्स, क्रिएटिव्ह थिंकिंग, क्रिटिकल थिंकिंग कशा पद्धतीने विकसित व्हायला लागलं याचा मी आज एक प्रसंग या ठिकाणी सांगणार आहे. खरेतर आठ दहा दिवसापासून शाळेच्या इमारतीच्या आवारात पेंटिंगचं काम सुरू होतं आणि त्या पेंटर दादाकडे बघून सारख मनात यायचं की किती सुंदर! हा चित्र काढतो. मुलांसोबत याबाबतीत चर्चा झाली आणि मुलांनी लगेच मॅडम आपण त्यांच्याशी बोलून बघूया ना, अशा पद्धतीचा सूर माझ्यापर्यंत पोहोचवला.




मलाही मुलांचा उत्साह पाहून आनंद झाला आणि मीही त्यांना लगेच होकार दिला. मुलांनी ठरवलं की आपण आपल्या पुस्तकात दिलेला जो उपक्रम आहे ना, मुलाखतीचा तो या दादासोबत घेऊया आणि आमची वेळ ठरली. मुले स्वतः जाऊन त्याच्याकडे त्यांची वेळ घेऊन आले, आल्यानंतर त्यांचे स्वागत करण्यापासून तर त्यांना प्रश्न विचारण्यापर्यंतचे सर्व काम मुलांनी केलं. मी मात्र फक्त बघ्याची भूमिका घेत होते पण हे बघत असताना मनातून अतिशय आनंद होत होता, की आपलीच मुलं आहेत न ही!अतिशय सुंदर पद्धतीने सर्व नियोजन मुलांनी केलं आणि प्रश्न सुद्धा अतिशय सुंदर दर्जेदार असे विचारले. उदाहरणार्थ, दादा तुम्हाला या क्षेत्राची आवड कशा पद्धतीने निर्माण झाले?



बदलत्या काळाचा तुमच्या कलेवर काही परिणाम होतो का? अशा प्रकारची यातून एक जाणवलं की मुलं कुठलंही काम स्वतः करू लागले होते. शिकण्याची प्रक्रिया त्यांची त्यांनी सुरू ठेवत होते. कॉन्फिडन्स मुलांचा कमालीचा वाढलेला दिसला. बोलण्यातील जे कौशल्य आहेत, संवाद साधण्याचे ते मुलांमध्ये खूप छान पद्धतीने विकसित झालेले जाणवले .कोलॅब्रेशन आणि कम्युनिकेशन हे दोन्ही कौशल्य मुलांमध्ये विकसित होताना दिसत आहेत. हे सर्व देणे भविष्यवेधी शिक्षण पद्धतीची आहे असं म्हणायला हरकत नाही आता मुले प्रत्येक गोष्ट अतिशय आवडीने शिकण्याचा प्रयत्न करतात.मुलाखत घेताना संपूर्ण प्रक्रियाच मुलांनी स्वतः केली याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर झळकत होता.आम्ही या पद्धतीचा उपयोग करून पाहिजे ते परिणाम मिळवत असतो. आपणही भविष्यवेधी शिक्षणाचा वापर करावा, आणि आपल्याला हवे ते परिणाम नक्की मिळवून द्यावेत.

**थँक्स वेध परिवार**




**हर्षदा चोपने**

**जिल्हा परिषद शाळा शिंदिवाढोणा,**

**तालुका झरी जामणी , जिल्हा यवतमाळ**

**संपर्क-9420046274**

# वेध - एक चमत्कार



• **सुषमा पाटिल**

**नमस्कार वाचक मित्रांनो,** मी सुषमा पाटील राजमाता जिजाऊ आश्रम शाळा वेरूळ तांडा, मी 2021 मधे प्राथमिक शिक्षिका म्हणून रुजू झाले. तो काळ कोरोनाचा असल्याने विद्यार्थी शाळेत येऊ शकत नसत. म्हणून शिकवण्याची संधी तशी कमीच मिळायची. त्यात 2022 मधे वेध अंतर्गत आश्रम शाळांसाठी निपुण भारत प्रशिक्षण सुरू झाले. Joining नंतर माझे हे पहिलेच प्रशिक्षण....
प्रशिक्षण काय असते, या बद्दल काहीच ज्ञान नाही. त्यातून प्रश्न पडला की हे प्रशिक्षण खास करून आश्रम शाळांसाठी इतके खास का असेल..?? प्रशिक्षण 10 ऑक्टोबर 2022 या दिवशी सुरू झाले. आमचे RP श्रीमती अनिता राठोड मॅडम आणि श्री बळीराम मुरमे सर यांनी आपल्या खास शैलीत सुरू केले. आणि त्यांच्या मार्गदर्शनाने आणि वेध द्वारे तयार केलेल्या खास पुस्तकातील मांडलेल्या विचारामुळे मला माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले.

या चार दिवसीय प्रशिक्षणात भविष्यवेधी शिक्षण म्हणजे काय..? आणि याचा भावी पिढी घडविण्यासाठी कसा उपयोग होईल ?

नुसतेच परीक्षार्थीच नाही, तर ज्ञानार्थी,विद्यार्थी कसे घडवावे याचे ज्ञान आम्हा शिक्षकांना लाभले. या बद्दल नंदकुमार साहेबांचे आणि वेध परिवाराचे खूप खूप धन्यवाद की त्यांनी तळागाळातल्या विद्यार्थ्यांना उच्च पातळीवर नेऊन स्वतःचे भविष्य घडविण्यासाठी. ज्ञानाचे दार उघडले.



हे प्रशिक्षण घेऊन आल्यावर यातील शिक्षणाच्या सहा पायऱ्यांचा उपयोग करून शिक्षणास सुरुवात केली.
विद्यार्थी हा शिक्षणा साठी फक्त शिक्षकावर अवलंबून नसून तो स्वयंप्रेरणेने कसा शिकू शकतो हे त्यातून समजले.
वर्गात group learning वर काम करताना विद्यार्थ्यांमध्ये एक नवीन उत्साह आला. आपण पण आपल्या शिक्षकां सारखेच आपल्या सोबतच्या मित्राला शिकवू शकतो ,याचा त्यांना एक नवीन अनुभव आला. एक उत्साह निर्माण झाला. उद्या आपल्याला शिकवायचं आहे, म्हणून त्यांनी स्वयंप्रेरणेने स्वतः आधी अभ्यासाला सुरुवात केली.
4थी च्या परिसर अभ्यासात पावसाचा शेतीवर होणारा परिणाम शिकविताना ज्या group ला शिकवायचे आहे त्यांनी  स्वतः घरी पेपर कप, तुटलेली भांडी यात झाडे लावली. एका भांड्यातील

झाडाला गरजे इतके पाणी घातले. आणि एका भांड्यातील झाडाला गरजे पेक्षा जास्त पाणी घातले. याचे 8 दिवस निरीक्षण करून मग ती झाडे शाळेत आणून प्रत्यक्ष उदाहरण द्वारे दाखवले. यातून शिकणाऱ्या आणि शिकविणाऱ्या group मधून मुलांना ज्ञान आणि आनंददायी शिक्षण मिळाले ते पण स्वयं अध्ययन आणि स्वयंप्रेरणेने.

आणि हे फक्त वेध च करू शकते.

तसेच, हसत खेळत शिक्षण सदरात वर्षातील पहिला सण संक्रांती ला मुलांना या सणा बद्दल माहिती देणारी चित्रे काढून आणायला सांगितली आणि हे बनवून आणणाऱ्या विद्यार्थ्यां सोबत selfie with success घेऊन आणि प्रोत्साहन पर छोटी बक्षिसे दिली असता मुलांनी वर्षभरात येणाऱ्या सगळ्या सणांची माहिती देणारी अनेक चित्रे आणि कलाकृती स्वयंप्रेरणेने तयार करून त्याचे महत्व group learning द्वारे समजावून दिले. वेध मुळे विद्यार्थ्यांमध्ये झालेला हा बदल खूप सकारत्मकता देऊन गेला.





म्हणूनच वेध हे फक्त शिक्षण नसून एक ज्ञानाचा दिवा, एक शैक्षणिक चमत्कार आहे.

वेध मुळे एक शिक्षक म्हणून माझ्यात पण एक नवीन विचार, शिक्षणाबद्दलचा एक नवीन दृष्टिकोन तयार झाला. ज्याचा वापर करून मी विध्यार्थ्यांमध्ये त्यांच्या हिताचा दृष्टीकोन रुजवू शकले या बद्दल वेध परिवाराचे खूप खूप धन्यवाद!!







**सुषमा पाटिल**

**राजमाता जिजाऊ आश्रमशाळा,वेरूळ तांडा**

**छत्रपती संभाजीनगर.**

**8888327869**

# वेध प्रकाशन



**नमस्कार ,**

वेध पब्लिकेशनची पुस्तके भरघोस सवलतीत उपलब्ध,
शैक्षणिक प्रेरणा आणि वर्गातील यशासाठी एकमेव पुस्तके!
शिक्षक, विद्यार्थी आणि अभ्यासक्रमात रुची असणाऱ्या प्रत्येकासाठी एक अनमोल वाचन!

**1. ग्लिम्पसेस ऑफ लर्निंग ₹ 190/-**

**2. स्पोकन इंग्लिश वेधकृती ₹ 160/-**

**3.होय, हे शक्य आहे...! ₹ 210/-**

**स्पेशल ऑफर - ₹ 560/- मूळ किंमतीची पुस्तके फक्त ₹ 500/- मध्ये घरपोच. (फ्री होम डिलिवरी)**

ही पुस्तके तुमच्या शैक्षणिक प्रवासाला नवीन चालना देणारी आहेत. या पुस्तकातून

✅ विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे सोपे आणि प्रभावी मार्ग
✅ वर्गातील व्यवस्थापन आणि शिकवण्याच्या पद्धतींचे रहस्य
✅ प्रेरणादायी स्वानुभव आणि उदाहरणे
✅ शिक्षक आणि विद्यार्थ्यांमधील संवाद सुधारण्याचे टिप्स
✅ स्वतः अपडेट राहू यासाठी अभ्यासाच्या नवीन पद्धती आणि तंत्रे

हे पुस्तक तुमच्या शिक्षणाच्या प्रवासाला एक नवीन दिशा देणारे आहे. शिक्षकांसाठी हे एक मार्गदर्शक तर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल.

**📖 ऑर्डर करा आजच! 📖**
**व्हॉट्सअॅप आणि कॉल - 9890018388**

शिक्षणाच्या नवीन उंची गाठण्यासाठी ही पुस्तके तुमच्या हातात असावेत!
शिक्षण हेच जग बदलण्याचे साधन आहे. ते साधण्यासाठी सुरुवात करा आजच!
- तुमच्या शिक्षणाच्या प्रवासाचे साथीदार.

वेध भविष्यवेधीशिक्षण, जागतिकदर्जाचेशिक्षण, प्रेरणा, विद्यार्थी, शिक्षक, पुस्तक, नवीनदिशा









**Online पुस्तके खरेदी करण्यासाठी येथे क्लिक करा .**

https://vedhfuturisticeducation.myinstamojo.com/









# प्रेरणा, प्रयत्न आणि आव्हान : विक्रमी निकालाचा सर्वांनाच अभिमान



• सौ. जयश्री सुनिल पलांडे

शिक्षण प्रक्रियेत शिक्षक म्हणून काम करताना, 'प्रभावी अध्यापन म्हणजे नेमके काय ?' या प्रश्नाचे उत्तर अनेक वेळा अनुभवाच्या आधारे शोधण्याचा प्रयत्न केला असता प्रत्येकवेळी 'सकारात्मक प्रेरणा देणे' वा **'आव्हान देणे'** हेच उत्तर मनात येते. प्रेरणेतून अध्ययनास प्रवृत्त करणारे अध्यापन ही एक आदर्श प्रणाली जाणवते.

'अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन' या प्रशिक्षणामध्ये आव्हानांचे महत्त्व सांगितले होते.

i) आव्हाने मुलांच्या शिकण्याची गती वाढवितात.
ii) शिकण्यात आवड निर्माण करतात.
iii) शिकणे सहज आणि आनंदी होण्यास मदत करतात.
iv) मुलांना त्यांच्या क्षमतांची ओळख करून देतात.
v) मर्यादा ओलांडून काम करण्याची प्रेरणा देतात.
vi) आव्हानामुळे निकोप वातावरण तयार होऊन वर्गातील प्रत्येक मुलाला त्याच्या क्षमतेनुसार किंवा पूर्ण क्षमतेने काम करण्याची संधी देतात.

या शैक्षणिक वर्षात इयता ८ वी या वर्गाचा वर्गशिक्षक म्हणून माझ्यावर जबाबदारी आली. शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये राज्यात सातत्याने अव्वल राहणाऱ्या शिक्रापूर केंद्रात आमची शाळा असल्याने एनएमएमएस् व शिष्यवृत्ती या दोन्ही परीक्षांची तयारी करणे हे आव्हान होते. हे आव्हान समर्थपणे पेलून राज्यातील एक उच्चांकी निकाल गाठता आला. यासाठी अनेक उपक्रम राबविण्यात आले. त्यापैकी विद्यार्थीकेंद्रित खालील तीन उपक्रमांचा विशेष उपयोग झाला.

### १. प्रश्नपेढी –

प्रत्येक नवीन घटक चर्चा करून संपल्यानंतर विद्यार्थ्यांनी स्वतः अध्ययन करून त्यावर जास्तीत जास्त प्रश्न तयार करून स्वतःची प्रश्नपेढी तयार करणे. यामुळे विद्यार्थ्यांचा प्रत्येक पाठावरचा सखोल अभ्यास झाला.

### २. गट पध्दती –

वर्गामध्ये वेगवेगळ्या अध्ययन क्षमतेचे विद्यार्थी असतात. प्रत्येकच विद्यार्थ्याला शिक्षकांनी शिकवलेले पहिल्याच प्रयत्नात समजेल असे नाही. प्रत्येकच वेळी प्रत्येक विद्यार्थी स्वतःला आलेली शंका शिक्षकांना विचारतोच असे नाही; परंतु जर विद्यार्थी गटात बसले तर प्रत्येक विद्यार्थी आपली शंका आपल्या गटप्रमुखांना विचारून ती सोडवून घेतो. ही प्रक्रिया अगदी हसत खेळत पार पडते. गट निवडताना खालील काळजी घेतली.

गट ४/५ मुलांचाच राहील. गटामध्ये अतिशय हुशार विद्यार्थी गटप्रमुख म्हणून काम पाहील.
दुसरा हुशार विद्यार्थी उपगटप्रमुख म्हणून काम पाहील.
तिसरा व चौथा विद्यार्थी हा त्याखालील श्रेणीतील असेल.



**शिष्यवृत्ती परीक्षेत राज्यात तिसरा आलेला रूत्विज सावंत गटप्रमुख म्हणून मुलांना मार्गदर्शन करताना......**

## अधिकारी विद्यार्थी संवाद ;

शालेय जीवनात शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ता यादीत आलेले व स्पर्धा परीक्षेत अलीकडील काळात यशस्वी झालेल्या अधिकाऱ्यांनी google meet वा प्रत्यक्ष भेट देवून विद्यार्थ्यांशी संवाद साधला व शालेय जीवनातील स्पर्धा परीक्षांचा भविष्यकाळात कसा उपयोग झाला याचे महत्त्व स्पष्ट केले. प्रेरणेसाठी हा उपक्रम खूप प्रभावी ठरला.

**श्री. अक्षय प्रल्हाद कोंडे (IPS) SP रुद्रप्रयाग (उत्तराखंड) google meet द्वारे विद्यार्थ्यांशी संवाद साधताना**





**मा. इम्तियाज काझी साहेब, शिक्षण सहसचिव महाराष्ट्र राज्य यांची वर्गास भेट व मुलांशी चर्चा .....**

आनंददायी वातावरणात विद्यार्थ्यांची स्वयंप्रेरणा जागृत करून नवीन ज्ञानप्राप्तीसाठी विविध १० आव्हाने वर्षाच्या सुरुवातीला अनौपचारिक चर्चेमध्ये विद्यार्थ्यांना दिली होती. त्याची पूर्तता कशी झाली ते खालीलप्रमाणे –

**आव्हान १** वाबळेवाडी शाळेतील एन.एम.एम.एस. परीक्षेचा आजपर्यंतचा सर्वोत्कृष्ट निकाल लावणे - वाबळेवाडी शाळेतील यापूर्वी सन २०२१-२२ मध्ये जास्तीत जास्त २७ मुले गुणवत्ता यादीत आली होती. तेव्हाही मीच त्या वर्गाची वर्गशिक्षक होते. ती संख्या मागे टाकून ३४ मुले गुणवत्ता यादीत येत नवीन रेकॉर्ड तयार झाले.

एक शिक्षक म्हणून अभिमानाची गोष्ट म्हणजे इयत्ता तिसरीनंतर तीन वर्ष शाळाबाह्य असलेला व वयानुरूप इयत्ता सातवी मध्ये आमच्या शाळेत दाखल झालेला विद्यार्थी ओंकार देवकुळे हा सुद्धा

आपल्या प्रामाणिक प्रयत्नांच्या जोरावर NMMS शिष्यवृत्तीचा मानकरी ठरला.

**आव्हान २ NMMS परीक्षेत शाळेत आत्तापर्यंत वैयक्तिक सर्वाधिक गुण मिळवणे -**

यापूर्वी शाळेत सन २०२२-२३ मध्ये सर्वाधिक म्हणजेच १५२ गुण मिळाले होते. यावर्षी कु. अपेक्षा जालिंदर वाबळे १५६ , विवेक गणेश कदम १५५, सिद्धी शामकांत माळी १५३ यांनी नवीन उच्चांक स्थापन केला.

**आव्हान ३ शिष्यवृत्ती परीक्षेत (इ. ८वी) आज पर्यंतचा पात्र विद्यार्थी संख्येचा शाळेचा सर्वाधिक निकाल लावणे** -यापूर्वी 2022-23 मध्ये ९१% निकाल लागला होता. यावर्षी तो ९५% लागला. या निकालाचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे हा निकाल पात्र टक्केवारी मध्ये महाराष्ट्रातील एक अव्वल तर पुणे जिल्ह्यात प्रथम क्रमांकाचा होता.

**आव्हान ४ शिष्यवृत्ती परीक्षेत (इ.८वी) आपल्या शाळेतील राज्य मेरिटमध्ये सर्वाधिक विद्यार्थी आले पाहिजेत.**

यापूर्वी २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये प्रत्येकी ४ विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत आले होते.

यावर्षी सर्वाधिक ५ विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत आले. राज्य गुणवत्ता यादीत सर्वाधिक विद्यार्थी येण्याच्या बाबतीत शाळेने पुणे जिल्ह्यात प्रथम तर राज्यात दुसरा क्रमांक मिळवला.

**आव्हान ५ शिष्यवृत्ती परीक्षेत (इ. ८वी) इंग्रजी विषयात ५० पैकी ५० मार्क्स मिळवणे.**

आत्तापर्यंत शाळेत इंग्रजी विषयात ५० पैकी ५० मार्क कोणालाही मिळाले नव्हते. हे आव्हान विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे स्वीकारले आणि सिद्धी शामकांत माळी, विवेक गणेश कदम, श्रीनिवास अनमोल करंजे या तीन विद्यार्थ्यांना ५० पैकी ५० मार्क्स मिळाले.

**आव्हान ६ शिष्यवृत्ती परीक्षेत (इ.५वी व ८वी) पटसंख्येशी तुलना करता गुणवत्ता यादीत येण्याचा नवीन विक्रम प्रस्थापित करणे.**

यापूर्वी सन २०२०-२१ मध्ये कोरोना कालावधीत श्री. सुनिल पलांडे वर्गशिक्षक असताना इयत्ता पाचवी चे ५० पैकी ४२ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले होते आणि ८४ % विद्यार्थी गुणवत्ता यादीत येण्याचा विक्रम शाळेच्या नावावर होता. हा विक्रम जर तुमच्या बॅचने मोडला तर प्रत्येक विद्यार्थ्याला पलांडे सरांकडून १५ ऑगस्ट २०२४ च्या कार्यक्रमात खास बक्षीस दिले जाईल असे जाहीर करण्यात आले होते.




हे आव्हान विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे स्वीकारले आणि ४१पैकी ३५ विद्यार्थी गुणवत्ता यादीत म्हणजेच शेकडा ८५.३६% विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले. गुणवत्ता यादीत आलेल्या सर्व विद्यार्थ्यांना वर्ग शिक्षकांच्या वतीने प्रत्येकी ५५०₹ ची स्कूल बॅग भेट देण्यात आली.

**आव्हान ७ राज्य गुणवत्ता यादी येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला एक स्मार्ट वॉच भेट देण्यात येईल.**

यावर्षी ८वीचे ५ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले. सर्व विद्यार्थ्यांना शाळेतील उपशिक्षक श्री. गोरक काळे सर यांच्याकडून प्रत्येकी ११०० रुपये किमतीचे स्मार्ट वॉच भेट देण्यात आले.

## आव्हान ८ राज्य गुणवत्ता यादीत स्थान पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत रायगड दर्शन -

यावर्षी आठवीच्या ५ विद्यार्थ्यांनी राज्य गुणवत्ता यादीत स्थान पटकावल्याने शिवदुर्ग प्रेमी प्रतिष्ठान शिरूर, पुणे यांचे मार्फत विद्यार्थी तसेच वर्गशिक्षकांना मोफत रायगड दर्शन घडविण्यात आले.सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार सन्माननीय शिक्षणाधिकारी श्री. संजय नाईकडे साहेब, सांगलीच्या उपजिल्हाधिकारी सौ.ज्योती नाईकडे मॅडम यांच्या हस्ते शिवराज्याभिषेकस्थळी घेण्यात आला.




## पूर्ण न झालेली आव्हाने

१. राज्यात प्रथम येण्याचे अवघड आव्हान दिले होते. २७८ गुण मिळवून रुत्विज विशाल सावंत ग्रामीण विभागातून ३रा आला.

२. १००% निकाल – NMMS परीक्षेत १ विद्यार्थी तर शिष्यवृत्ती परीक्षेत २ विद्यार्थी अगदी थोड्या गुणांनी अपात्र झाले.

मुलांना आव्हान स्वीकारायला आवडते. वर्गात अशी वेगवेगळी आव्हाने दिली तर मुलांमध्ये एकमेकात चुरस निर्माण होते आणि जिंकण्याच्या स्वाभाविक भावनेचा वापर शिकण्याच्या प्रक्रियेत करता येतो. वरवर अशक्य नी अवघड वाटणाऱ्या बाबी सहज सोप्या होऊन जातात.

जेव्हा शिक्षक व विद्यार्थी आंतरक्रिया उत्तम असते तेव्हा विद्यार्थी व शिक्षक यांच्यातील दृढ विश्वासाचा बंध तयार होऊन यशाला गवसणी घालने कधीही कठीण होत नाही.





**सौ. जयश्री सुनिल पलांडे**
**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाबळेवाडी ,**
**ता. शिरूर जि. पुणे**
**संपर्क क्रमांक : ९७६७०२२०८६**

# भित्रा ससा कसा ?
# तो तर धाडसी हाली जसा....



• **शोभा माने**



आपल्या मुलांनी छान शिकून पुढे जावं, स्वावलंबी व्हावं, स्पर्धेच्या युगात टिकून राहावं....पालकांच्या अपेक्षा या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासा साठी शिक्षकांनी वैयक्तिक लक्ष द्यावे इतकीच माफक अपेक्षा असते ही अपेक्षा अगदी रास्तही असते त्यासाठी ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळातील विद्यार्थ्यांचे शिकणे हे कित्येक वेळा शिक्षकांवर अवलंबून असते कारण पालक रोजी रोटी साठी दैनंदिन कामात व्यस्त असतात आपल्या वैयक्तिक अडचणीमुळे मुलांकडे लक्ष देणे होत नाही अशा वेळी शिक्षकांची दुहेरी जबाबदारी सुरू होते एकीकडे प्रशासकीय कामं , प्रशिक्षण, विविध स्पर्धा परीक्षा तयारी अशैक्षणिक कामं वगैरे...आणि दुसरीकडे वर्गाध्यापनाची जबाबदारी अत्यंत महत्त्वाची असते जेणेकरून प्राथमिक शिक्षण घेत असताना निपुण भारत अंतर्गत मुलांचा पाया पक्का झाला तर भविष्यात ते लेकरू कधीच मागे वळून पाहत नाही याची जाणीव शिक्षक म्हणून मला आहेच पण ती सर्वच पालकांना असावी असं आपण नेहमीच म्हणतो आणि ही जाणीव असणारे काही पालक मला नेहमीच फोन करतात किंवा शाळेत प्रत्यक्ष भेटतात आणि आपल्या पाल्याची प्रगती समजून घेतात त्यापैकीच एक विद्यार्थी म्हणजे इ .1ली चा चि .व्यंकटेश विजय शेळके अतिशय बारीक कुडीचा नम्र,शांत ,संयमी , आज्ञाधारक आणि शिस्तप्रिय तितकाच हुशार सुद्धा नियमित अभ्यास पूर्ण करणार एखादा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर खूप हळू आवाजात अगदी माझ्या कानात येऊन सांगणारा हा व्यंकटेश पालकांच्या दृष्टीने काहीसा घाबरट भित्रा ससा म्हणा हवं तर (असं त्याची आई म्हणते).... आई त्याची खूप काळजी करते त्याने धीट व्हावं, मोठ्याने बोलावं, इतरांशी बिनधास्त संवाद साधावा. अशीच काहीशी अपेक्षा ठेवून त्यांनी वानवडा जिल्हा परिषद शाळेत आपल्या या एकुलता एक लाडक्या लेकराला प्रवेश दिला कारण माझ्या वर्गात पहिली अखेर लिहिणे,वाचणे, गणिती क्रिया करणे, बालसभेत सहभाग घेणे, वेशभूषा करून सभाधिट पणे सभेत बोलणे, इ वर भर असतो त्यामुळे त्यांनी माझ्या वर्गात व्यंकटेश ला प्रवेश द्यायचे ठरवले आणि माझ्या दृष्टीने त्यांची अपेक्षाही फार काही मोठी नव्हती, त्यामुळे इतरांसोबत त्याला सभाधिट करण्यासाठी माझा नेहमीच प्रयत्न असतो. त्या प्रयत्नांना यशही येते कारण दिनविशेष साजरे करताना तो अधून मधून भाषण स्पर्धेत भाग घेतो परिपाठ मध्ये सहभाग घेतो पण ते तितक्यापुरतेच मर्यादित असते. एरवी तो शांत आणि समंजस असतो. लेखन वाचन करतो.गणिती क्रिया करताना आव्हाने स्वीकारतो, इंग्रजी शब्द लिहितो अन् शब्द पाठही करतो. प्रश्नांची उत्तरे देतो कविता सादर करतो एकंदरीत वर्गातला एक गुणी विद्यार्थी म्हणून मी त्याच्या कडे पाहत असते.व्यंकटेश ची आई शाळेत भेटायला आली की मला नेहमीच एकदा घरी या मॅडम असं म्हणते पण शाळेपासून त्याचे घर काहीसे दूरच जवळपास दोन किलोमीटर अंतरावर राहणारा व्यंकटेश कुठे आणि कसा राहतो ? हे आज मी पाहायचं ठरवलं. त्याला सोबत घेऊन मी त्याच्या घराकडे निघाले औशाकडे जाणाऱ्या रस्त्याला शेतात त्याचे घर आहे




त्याला सोबत घेऊन मी त्याच्या घराकडे निघाले औशाकडे जाणाऱ्या रस्त्याला शेतात त्याचे घर आहे आणि तो तेथून वडिलांच्या गाडीवर क्वचितच शाळेत येतो कारण गाडी जाण्यासारखा रस्ता शेतातून जात नाही त्यामुळे तो पायी जास्त करून शाळेत येतो आणि जातो विशेष म्हणजे तो नियमित उपस्थित असतो शेतातील रस्ता अरुंद आणि अडवळणाचा, निर्मनुष्य अगदी सामसूम असलेला आज मी जेव्हा त्याच्या घरी गेले तेव्हा त्याचा अनुभव आला तेव्हा मी अवाक् झाले कारण एवढंस 1लीचं चिमुरडं लेकरू (येणे जाणे) रोज चार किलोमीटर चालत शाळेत जातं आणि येतं कारण त्याला शाळा शिकायची आहे सभाधीट व्हायचंय, शिकून मोठं व्हायचंय, आई वडिलांचं स्वप्न पूर्ण करायचंय. पालकांच्या अपेक्षा वास्तव आहेत पण या अपेक्षा पूर्ण करताना मात्र त्याची दमछाक होतेय याची मात्र मला पुरती जाणीव झाली. त्याच्या आईला मी म्हणाले, व्यंकटेश अनेकदा एकटाच शाळेत येतो म्हणजे माझ्या दृष्टीने तो सभाधिटच नव्हे तर धाडसी आणि हुशार विद्यार्थी आहे कारण त्याने मला घराकडे जाताना मॅडम हा रस्ता गाडीसाठी चांगला नाही इथून चालत जाता येते. पलीकडच्या रस्त्याने गाडी जाते.पाणवठा असलेल्या वरच्या बाजूने ,शेताच्या बाजूने,उसाच्या बाजूने ,डावीकडे, उजवीकडे, वरच्या पट्ट्या वरून, आणखी थोडा चढ आहे, तिकडे थोडा खड्डा आहे. गाडी घसरत जाते इथून, जपून गाडी चालवा मॅडम सावकाश घ्या आता थोडं पुढे गेलं की माझं घर येतं फुलं आहेत बघा तिकडेच आहे...

अशा पद्धतीने तो मला स्कूटी चालवताना मार्गदर्शन करत होता खरे तर त्याच्या बोलण्यातून मला सर्जनशील विचार करणारा पिसा रेडी विद्यार्थी दिसत होता मग मला सांगा तो भित्रा ससा कसा असू शकतो? नक्कीच नाही .तो धाडसी नाही का? माझ्या दृष्टीने तो खूप समजदार, सोशिक आणि धीट मुलगा आहे जुन्या अभ्यास क्रमातील धाडसी हाली सारखाच आहेआणि तो घरी जाताना माझ्याशी इतक्या सहजतेने संवाद साधत होता की ,माझा विश्वास बसत नव्हता की तो माझ्याशी आत्मविश्वासाने अन मोकळे पणाने इतक्या गप्पा मारेल. मॅडम आपल्या घरी इतक्या दूर शेतात येत आहेत याचा त्याला अधिक आनंद होत होता त्यामुळे घराकडे जाणाऱ्या रस्त्या बद्दल सहज सांगत होता म्हणूनच तो माझ्या दृष्टीनं मला सहयोग करत होता. हे सर्व मला अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन या प्रशिक्षणामुळे करता आले. त्यातल्या सहा पायऱ्या, सेल्फी विथ सक्सेस, आव्हाने देणे व शिकण्यास प्रेरणा देणे या पायऱ्यांची ही कमाल आहे.

**टीप:** व्यंकटेश च्या घरी मात्र खूप छान वातावरण आहे शेतातलं टुमदार घर अवतीभोवती उसांची गर्दी फुलं ,फळ आणि हिरवं गार माळरान खूपच छान रमणीय परिसर त्याचे आजोबा वय वर्ष 85 वसुली अधिकारी म्हणून रिटायर्ड झालेले आहेत त्यांच्याशी खूप गप्पा झाल्या. आपण कित्येकदा म्हणतो मी आणि माझं काम भलं पण पालकांच्याही भेटी घेणं गरजेनुरूप आवश्यकच असतं आज घरी यायला थोडा उशीर झाला खरा पण मला व्यंकटेश ची केस स्टडी करता आली जी मला त्याची व्यक्तिगत प्रगती साधताना उपयोगी पडेल



याचा मात्र अधिक आनंद झाला आणि हो विद्यार्थी घडत असताना एकेक मूल समजून घेत आवश्यक तेव्हा गृहभेटी जर दिल्या तर नक्कीच फायदा होतो हे मात्र तितकेच खरे आहे कारण व्यंकटेश आता अनेक स्पर्धा मध्ये सहभागी होत आहे बालसभा असो की वेशभूषा नक्कीच सहभाग नोंदवतो सावित्री बाई फुले जयंती दिनी अस्खलित भाषण केले अन् परवा प्रजासत्ताक दिनीही महात्मा फुले बनून प्रभात फेरीत सर्वात पुढे होता. खरी कमाई उपक्रमात ही दुकान थाटले होते त्याचे आई वडील आवर्जून खरेदीला आले होते व्यंकटेश वर खूप खुश होते आता व्यंकटेश सभाधिट झाला आहे म्हणत होते आणि माझ्या कडे पाहून दोघेही हसत होते.. मी म्हटलं तो आता भविष्य वेधी शिक्षणासाठी सज्ज आहे.





**शोभा माने**
**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वानवडा,**
**तालुका औसा जिल्हा लातूर.**
**मो.क्र.8208334145**

# गोष्ट सेल्फीच्या सक्सेसची



शर्मिला सुभाष खैरनार.

ही गोष्ट सुरू होते डिसेंबर 24 मध्ये..... 31 डिसेंबर ते 4 जानेवारी या कालावधीमध्ये अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन हे प्रशिक्षण झाले.आयुष्यात नित्यनेमाने गोष्टी घडत असतात तसेच शिक्षकांच्या आयुष्यात ट्रेनिंग हे येत असतात. पण या ट्रेनिंगने कार्याला एक नवीन दिशा मिळवून दिली. मुल स्वतः कसे शिकू शकते? हा विचार डोक्यात असतानाच, माझ्या वर्गातील मुली स्वतःच एक अंकी व दोन अंकी गुणाकार करायला शिकल्या. जेव्हा प्रशिक्षणात मी सुलभक म्हणून काम करत होते आणि त्यानंतर वेध विचार प्रगल्भ झाल्यानंतर मी त्या दिशेने काम करायला सुरुवात केली.

खरंतर वर्गात काम करत असताना त्याची प्रसिद्धी का व्हावी असे वाटत होते? पण मग लक्षात आलं की चांगल्या कामांचा प्रसार आणि प्रचार व्हायला लागला तर जिल्हा परिषद शाळांबद्दलची जी नकारात्मकता आहे ती कमी व्हायला नक्कीच, मदत होईल आणि मग इथून सेल्फीच्या प्रवासाची सुरुवात झाली. फोटो काढायला सगळ्यांनाच आवडते आणि तो फोटो जर वर्ग शिक्षकांसोबत असेल, तर आनंद काही वेगळाच असतो हा मुलांच्या भावविश्वातील विचार, ही कल्पना मनाला अतिशय पटली. सेल्फी चे अनेक फायदे किंवा यश मला मिळालेले आहे आणि हा प्रयोग मागील वर्षभर मी करते आहे.

सेल्फी मुळे माझ्या आणि विद्यार्थ्यांचे बंध अधिक घट्ट झाले आहेत.

इयत्ता दुसरीतील नंदिनी माळत कर ही लिखाणाला अतिशय कंटाळा करणारी मुलगी अनेकदा सांगूनही तिचे लेखन वेळेवर पूर्ण व्हायचे नाही त्यावेळी मी तिला आव्हाने द्यायला लागले. इतर मुलींचे मॅडम बरोबर सेल्फी निघतात हे पाहून नंदिनी पण आता हळूहळू लिखाण करू लागली होती;की आपलाही मॅडम सोबत सेल्फी निघाला पाहिजे. आज त्या गोष्टीला सात ते आठ महिन्यानंतर यश आलं.



शाळेतील लिखाण पण करायला लागली आणि तिचे अक्षर पण छान झाले.

रितिका ही माझ्या वर्गातली असर लेव्हलची विद्यार्थिनी मी वर्गात गणिताच्या तसिकेला आव्हान दिले की स्वतःच्या मनाने वजाबाकीची जास्तीत जास्त गणिते घेऊन कोण सोडवणार तर रितीकाने सर्वात जास्त म्हणजे 45 उदाहरणे दिलेल्या वेळेत सोडवली आणि सेल्फी ची मानकरी ठरली. त्यामुळे मला कळलं की ती असरची पातळी पार करून पुढे गेली आहे.

अश्विनी पिंपळे ही आईसोबत ऊस तोडणी ला जाणारी मुलगी, गेल्या दोन वर्षापासून ती सतत चार -चार महिने आपल्या आई सोबत या कामावर जात असते. यावर्षी नवीन सत्राच्या सुरुवातीला



आल्यावर तिच्या लक्षात आलं की मॅडम हुशार विद्यार्थ्यांसोबत सेल्फी घेतात. आदिवासी दिनानिमित्त केलेल्या नृत्याबद्दल मी तिच्यासोबत सेल्फी घेतला तेथून अश्विनी मध्ये खूप बदल झाला. ती रोज शाळेत येऊ लागली आज ती वाचनात वाक्य स्तरावर आहे पण अभिव्यक्तीच्या बाबतीत मात्र वर्गात सगळ्यात पुढे आहे. वर्गात ओळखा पाहू यावर कोडी तयार करण्यास सांगितले आणि अश्विनीने ते आव्हान स्वीकारून तब्बल 23 कोडी केले. आता कोणत्याही विषयावर अश्विनी सहज मनोगत व्यक्त करते आणि यावर्षी ती आई सोबत ऊस तोडणीच्या कामाला गेली नाही.

सेल्फी चा एक अतिशय हृदयस्पर्शी प्रसंग माझ्या वर्गात घडला माझे वडील या विषयावर व्यक्त होण्यासंदर्भातील आव्हान मी मुलांना दिले चार-पाच मुलींनी मनोगत व्यक्त केल्यानंतर,प्रतीक्षा पटाईत ही मुलगी बोलण्यासाठी पुढे उभी राहिली, आणि बोलू लागली तिचे बोलणे ऐकून माझ्या डोळ्यात पाणी तरळले कारण दोन वर्षांपूर्वीच तिच्या वडिलांचा मृत्यू झाला होता. ती पहिलीत असताना तिच्या वडिलांचा मृत्यू झाला होता आणि वडील जिवंत आहे असे समजून ती आपले मत मांडत होती तिचे शेवटचे दोन वाक्य होते दिवाळीसाठी माझ्या वडिलांनी फटाके आणले मग मी वडिलांना नमस्कार केला तिचं हे बोलणं ऐकून मी वर्गाच्या बाहेर जाऊन अश्रूंना वाट मोकळी करून दिली. प्रतिक्षा ची समज ,विषयाला अनुसरून बोलणं आणि लहान वयातच तिने परिस्थितीशी केलेली तडजोड मला खूप काही शिकवून गेली .




आपण शिक्षक म्हणून काम करत असणारा समोर बसलेली बालके आपल्याला खूप काही शिकवून जात असतात माझ्या सेल्फीच्या प्रवासातील हे काही अविस्मरणीय प्रसंग आज अशी वेळ आहे की वर्गात केंद्रप्रमुख जरी आले तरी मुले मन मोकळेपणाने त्यांच्याशी संवाद साधतात. आणि सेल्फी घेण्याचा आग्रह करतात हा आत्मविश्वास ,विचार करण्याची क्षमता खरच त्यांना वेधच्या सहा पायऱ्यातून मिळालेली आहे.

**थँक्स वेध परिवार**



**श्रीम.शर्मिला सुभाष खैरनार.**
**जि.प .कन्या शाळा हिरापुर**
**ता.चाळीसगाव जी.जळगाव**
**संपर्क क्र.9850659525**

# अभिप्राय

# "आणि 'SQ3R' ने इतिहास समजू लागला."



• स्वाती खुडे (उनवणे)

**" इतिहासाच्या पानावर**
**रयतेच्या मनावर**
**मातीच्या कणावर**
**आणि विश्वासाच्या प्रमाणावर**
**राज्य करणारा राजा**
**म्हणजे राजा शिवछत्रपती".**
🚩🚩🚩🚩🚩🚩🚩🚩
**"एक होतं गाव**
**महाराष्ट्र त्याचा नाव**
**आणि स्वराज्य ज्यांनी घडवलं**
**शिवराय त्यांचं नाव."**

अशा अनेक अलंकारिक वाक्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर भाषण करणारे विद्यार्थी आमच्या इयत्ता पहिली ते चौथीच्या वर्गात आहेत. ते बोलतात, त्यांचे शिवरायांवर प्रेम आहे. हे या समजून येते. परंतु या मुलांना शिवराय नक्की कळलेत का? समजलेत का? मुलांना स्वराज्याचा खरा अर्थ कळला आहे का? असे अनेक प्रश्न माझ्या मनात येत होते. हे प्रश्न उपस्थित व्हायलाही तसे कारण होते. ते म्हणजे माझ्याकडील असणारा इयत्ता चौथीचा वर्ग. इयत्ता चौथीच्या वर्गाला शिवरायांचा इतिहास मी शिकवत होते. पण तो त्यांच्या स्मरणात राहतोय की नाही हा प्रश्न माझ्यापुढे राहून राहून सारखा येत होता. कारण शिवरायांचा इतिहास शिकवताना तो एक पाठ्यक्रम आहे म्हणून मी शिकवत नव्हते. मुलांच्या बालमनावर शिवरायांचे विचार कायम स्मरणात, आचरणात यावे असे मला वाटत होते. त्यासाठी मी विविध पद्धतींचा अवलंब देखील केला. गोष्टी रूपाने शिकवले, चित्रपट दाखवले, प्रसंगांचे नाट्यीकरण केले, पोवाडे ऐकवले असे अनेक प्रयत्न केले.

परंतु त्याना त्याचे आकलन झाले आहे की नाही हे पडताळून पाहत असताना माझ्या पदरी निराशाच येत होती. मुलांना इतिहास, परिसर अभ्यास यासारखे विषय समजण्यास कठीण जात आहे असे मला दिसून येत होते. मुलांना शिकवताना माझेच प्रयत्न कमी पडत आहेत असे मला वाटू लागले. यासाठी मी वेगवेगळ्या साधन तंत्रांचा वापर करू लागले. वेध पुणे जिल्हा यावर एक पोस्ट आली.

🎯 "नवीन वर्ष नवीन कौशल्ये"🎯

'SQ3R' वाचन तंत्र शिकून आणि आपले तसेच आपल्या मुलांचे वाचन कौशल्य विकसित आता.
"आता वाचन होईल सोपे लक्षात राहील प्रत्येक गोष्ट".
"नवीन वर्षी स्वतःला आणि आणि आपल्या मुलांना देऊ या वाचनाचा एक नवीनन दृष्टिकोन".
"तुमचे आणि तुमच्या मुलांचे वाचन कौशल्य वाढवण्यासाठी आज पासून नववर्षानिमित्त संकल्प करू या".

आणि खाली कोर्सची लिंक दिली होती त्या दिवशीच मी मनाशी ठरवलं आपण हा कोर्स करायचा प्रत्येक मुल शिकते होणे हा वेध चा गाभा पकडून मी 'SQ3R' तंत्राचा इयत्ता चौथीच्या

वर्गाला शिकवताना वापर करायचा असे ठरवले. त्याप्रमाणे कृतीही करण्यास सुरुवात केली. 'SQ3R' कोर्सची माहिती घेतली .तो समजून घेतला. स्वतः त्याचा अवलंब केला आणि पुन्हा नव्याने शुभारंभ केला

'SQ3R' ही सर्वेक्षण, प्रश्न ,वाचन, पाठ करणे ,पुनर्विलोकन/ पुनर्परीक्षण अशा पाच चरणानी मिळून बनलेली अभ्यासाची एक महत्वपूर्ण पद्धत आहे. हे मला समजले आणि मी त्याचा अवलंब माझ्या इयत्ता चौथीच्या वर्गात पाठ्यक्रम शिकवताना करायचा असे ठरवले.



इतिहास, परिसर अभ्यास या विषयांचे समजपूर्वक आकलन मुलांना होत नाही हे मला माहीत होते. त्यामुळे या तंत्राचा वापर मी या दोन विषयांपासूनच सुरू केला.
छत्रपती विषयी असणारा आदर, प्रेम यामुळे इतिहासापासूनच सुरुवात केली.
पाठाचे नाव होते" शर्थीने खिंड लढवली". मुलांना प्रथम मी पाठातील चित्राचे निरीक्षण ,पाठातील ठळक मुद्द्यांचे वाचन करण्यास सांगितले. पाठ किती पानांचा आहे हे पाहायला सांगितले. त्यानंतर पाठखालील प्रश्न वाचून घेतले.

पाठातील एकेक ठळक मुद्दा प्रत्येक विद्यार्थ्याला वाटून दिला .त्या मुद्द्यांवर मुलांना जास्तीत जास्त प्रश्न तयार करायला सांगितले. त्याप्रमाणे मुलांनी प्रश्न निर्मिती करायला सुरुवात केली. पाठातील " पन्हाळा जिंकला आणि आदिलशहा चिडला" या मुद्द्यावर अथर्वने सगळ्यात जास्त म्हणजे दहा प्रश्न तयार केले. एकाच वाक्यावर दोन दोन प्रश्न तयार केले .त्याचे पाहून हळूहळू आयुष,तन्वी , सुहानी, संस्कार यांनीही त्यांना दिलेल्या मुद्द्यांवर जास्तीत जास्त प्रश्न तयार केले. हे करत असताना त्यांच्यातील 21 व्या शतकात आवश्यक मानली जाणारी "6 C" पैकी CRITICAL THINKING, CREATIVITY, COLLABORATION, COMMUNICATION अशी चार कौशल्य विकसित होताना दिसू लागली. अशाप्रकारे तो पाठ मी सर्वेक्षण, प्रश्न विचारणे, वाचन, पुनरावृत्ती करणे ,पुनर्विलोकन करणे या 'SQ3R' तंत्राचा वापर करून मुलांकडूनच शिकवून घेतला .परिणामतः मला मुलांमध्ये खूप सकारात्मक बदल दिसून आला अशाच पद्धतीने मी परिसर अभ्यास आणि इतिहास हा विषय
जो मुलांना समजपूर्वक अकलण्यासाठी कठीण वाटत कारण. तो मुलांना स्वयंप्रेरणेने शिकता यावा यासाठी मदत आणि वातावरण उपलब्ध करून देऊ लागले.

"SQ3R" या अध्ययन तंत्राचा परिणाम मुलांमध्ये दिसू लागला. मुलांना हे विषय आणि बाकीचे इतर विषयही अतिशय सोप्या पद्धतीने आकलन होऊ लागले. मुलांना या पद्धतीमध्ये आनंद ,उत्साह, उत्सुकता कुतूहल वाटू लागल. हळूहळू मुले स्वतःच या तंत्राचा वापर करून मी सांगण्याआधीच पुढील पाठांचे प्रश्न तयार करू लागले.

मुले प्रत्येक विषय घटक उपघटक स्वतः समजून घेऊन अध्ययन करू लागली आहेत .याचा परिणाम मला माझ्या इयत्ता दुसरीच्या मुलांमध्ये दिसू लागला आहे. ते सुद्धा त्यांच्या इयत्ता चौथीतील दादा, दीदींप्रमाणे अनुकरण करून त्यांच्या इयत्ता दुसरीच्या वर्गाच्या विषयांचे अध्ययन करत आहेत. त्यांच्यातही चुरस, उत्सुकता, उत्साह, आनंद, कुतूहल निर्माण झाले आहे. एकूणच मुलांमध्ये अध्ययनाची आवड निर्माण झाली आहे.





हे केवळ आणि केवळ वेध परिवारामुळे साध्य होत आहे .एक शिक्षक म्हणून मिळणारा जो आत्मिक आनंद ,समाधान हे खऱ्या अर्थाने आज समजत आहे.

अध्यापनाच्या या प्रक्रियेत" बे एके बे" प्रणाली न वापरता "बे एके बे च का आहे? हे समजून सांगण्याचा आनंद आज मिळत आहे.

या सगळ्यांसाठी पूर्ण वेध परिवार, वेध पुणे जिल्हा ग्रुप, वेध पुणे जिल्ह्याचे समन्वयक श्री. नितीन मेमाणे सर, वेध पुणे जिल्हा ग्रुपमध्ये मला सदस्य करून घेणाऱ्या सौ. मनीषा कुऱ्हाडे मॅडम तसेच संपूर्ण वेध परिवारातील सदस्यांचे खूप खूप धन्यवाद !!!

**AT THE END" NOTHING IS IMPOSSIBLE ".**










**नाव:- स्वाती खुडे (उनवणे)**
**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गडाचीवाडी(खोडद)**
**तालुका:- जुन्नर, जिल्हा :-पुणे**
**मोबाईल:- 7709223397**

# आव्हान

उठा चला गुरुजींनो शाळेत चलू
21 व्या शतकातील आव्हाने पेलू

अनुभवाची नका कास धरू
त्यावर चिंतन मनन करू
वर्गाची आपल्या पातळी ठरवू
मुलांना आता कौशल्याधिष्ठित बनवू

ट्रेनिंगचा आपल्यावर होऊ द्या आसर
नका होऊ द्या वाटा धुसर
कामात आता करू नका कसर
मुले शोधू पातळीतील असर

कामाचा आता घेऊ ध्यास
मुले शोधू पातळीतील नॅस
ते करतील स्वतःच अभ्यास
आपण भरवू मदतीचा घास

डोक्यातील आता काढू पिसा
मुलांना देऊ प्रेरणेची दिशा
मुल आता शिकेल कसा?
स्वयंप्रेरणेने गाठेल पिसा

वलसे आणि कुलकर्णी मॅडमला हमी देऊ
आसरच्या मुलांचा न्यास गाठू
न्यासच्या मुलांना पिसात भेटू
पिसाच्या मुलांची जागतिक पातळी गाठू

उठा चला गुरुजींनो शाळेत चलू
21 व्या शतकातील आव्हाने पेलू



आशा करकिले
प्रा.शा.धनेगाव (स.शि.)
केंद्र.बाभळगाव
ता.जि.लातूर




# नि पू न भा र त

जागतिक या दर्जाचे
वेध भविष्य शिक्षण
साऱ्यांनाचं समजून
घ्यावे लागेल प्रशिक्षण...१

अध्ययन निष्पत्तीचे
समजून घेऊया धडे
स्तर कौशल्य वाढविण्या
मोजण्यास देऊ खडे...२

करू जिज्ञासू वृत्तीचा
मुलांचा आपण सन्मान
आत्मविश्वास बळकट होण्या
शिक्षका वाटे अभिमान...३

मुले आहेत असर पासून
न्यास आणि पिसाची
ओळखून त्यांची पातळी
एकविसाव्या शतकाची..४

स्वत: शिकण्यास प्रेरित
करूनी साऱ्या मुलांना
आत्मसन्मान वाढू तयांचा
संधी देऊया आव्हानांना...५

अध्ययन निष्पत्तीचे
स्तर कौशल्य रुजून
बघा होईल प्रेरीत
मुलं स्वत:च शिकून....६

गरज विषय मित्रांची
लागेल वर्गा शिकवाया
गल्ली मित्र येई धावून
मत आपुले मांडाया...७

तंत्रज्ञान युग आले
जोड त्यास गुगलची
मुले हाताळती टॅब,मोबाईल
चाहूल एकविसाव्या शतकाची..८

बदलत्या या युगात
परिणाम दिसावे शाळेत
असर, न्यास, पिसा साठी
वाढ दाखवूया गुणवत्तेत...९

चिकित्सक या वृत्तीला
जोड सिक्ससी ची न्यारी
जर्मन फ्रेंच भाषा गिरवू
।मेळे विद्यार्थ्या नवी उभारी...१०

नैसर्गिक शिक्षणाचा
भक्कम पाया रचावा
जागतिक भविष्याचा वेध
मुला मुलातं रुजवावा..११

आंतरराष्ट्रीय दर्जाचे
शिक्षण आपुल्या दारी
सहा पायऱ्या चार आयाम
वाबळेवाडी लई भारी..१२

नंदकुमार साहेबांची
तळमळ शिक्षणा प्रती
जोड तयासी निलेशजींची
वाढावी अध्ययन गती...१३

अध्ययन प्रकियेचे
व्यवस्थापन प्रशिक्षण
सातत्यपूर्ण सर्वंकष
होईल ते मूल्यमापन...१४

जगा व्हावे कल्याण
भारत देशा भक्कम पिढी
स्वत: प्रेरीत करू बालका
शाळा उभारू गुणवत्ता गुढी...१५



**कवयित्री**
**माधुरी केवळराव पाटील**
**जिल्हा व राज्यपुरस्कार प्राप्त शिक्षिका**
**मॉडेल स्कूल मोडाळे**
**ता. इगतपुरी जि. नाशिक**
**मोबा- ७५८८४९३२६०**

# आव्हानांची किमया पाहूया जिद्दीने यशाचे शिखर गाठूया

• **श्री अमोल सुशीला माणिकराव गुळवे**

भविष्यवेधी शिक्षण प्रक्रियेच्या नवीन दृष्टिकोन विकसित करणाऱ्या सहा पायऱ्या आहेत. शिक्षकांचा उत्साह वाढवणारी पायरी म्हणजे मुलांना शिकण्यास आव्हान देणे होय. प्रशिक्षणानंतर वर्गात कशा पद्धतीने काम करायचे याची माहिती मिळाली. अर्थातच सुरुवातीला आव्हान योग्य पद्धतीने कसे द्यायचे यासाठी माझ्याकडे अनुभव नव्हता. प्रत्यक्ष मुलांना आव्हान द्यायला सुरुवात केली. सुरुवातीला कमी प्रमाणात यश आले.परंतु नियोजनबद्ध व विषयाला धरून आव्हान दिल्यास यश येऊ शकते. हा आत्मविश्वास निर्माण होऊ लागला. हळूहळू विद्यार्थ्यांना आव्हान देणे ही अत्यंत कमालीची व प्रभावी प्रक्रिया आहे हे लक्षात आले.



मुलांना वर्गात आव्हान द्यायला सुरुवात केली पालकांच्या मदतीने जोडशब्द वाचनाचा व्हिडिओ तयार करा पुठ्ठ्यापासून अल्फाबेट्स तयार करा. कमी वेळात जास्तीत जास्त उदाहरणे तयार करा. त्याचबरोबर युट्युब व गुगल यांचा वापर करून रंगांची फळांची अवयवांची खेळांची व इतर विविध विषयांची माहिती आणायला सांगणे. या वर्गात घडणाऱ्या आव्हानांना मुले मात्र सकारात्मक आणि उत्तम प्रतिसाद देऊ लागली. दुसरीतील कवितांचा कृतीयुक्त व्हिडिओ तयार करा.. योगासन करताना चा व्हिडिओ तयार करा.. व्यायाम प्रकार सादरीकरणाचा व्हिडिओ तयार करा.. आश्चर्य म्हणजे वर्गातील बरेचसे मुले पालकांच्या मदतीने अतिशय सुंदर व्हिडिओ तयार करू लागले.. परंतु मला आनंद होता मुलांना शिक्षणाची व स्वतः शिकण्याची सवय हळूहळू लागत आहे.. स्पेलिंग पाठांतर, शब्द वाचन,अध्ययन कार्ड वाचन, अल्फाबेट्स कार्ड वाचन.. इत्यादी आव्हाने मुले उत्तमरीत्या पार पाडू लागली.. विशेष म्हणजे वर्गातील सर्व मुले सहभागी होण्यासाठी प्रयत्न करू लागली.

एके दिवशी आदरणीय रोहिणी पिंपर खेडकर विद्यासागर मॅडम यांचा सुंदर लेख FACEBOOK वाचला. त्यामुळे मी आणखीन प्रभावित झालो. विद्यासागर मॅडम म्हणतात आव्हान मुलांना त्यांच्यातील उच्चत्तम क्षमतांना उपयोगात आणण्याची प्रेरणा व संधी देतात. जर सशाने कासवा सोबत शर्यत लावली नसती तर कासव देखील जिंकू शकते ही बाब जगासमोर आली नसती म्हणून



शिकण्यासाठी आव्हान द्या.
त्यांनी व्यक्त केलेले मत अगदी खरं आहे. याची मला वर्गात प्रचिती आली.

गणपती सुट्ट्या लागण्याच्या शेवटच्या दिवशी मुलांना म्हटले मी एक तुम्हाला आव्हान देणार आहे.. मुले म्हटली द्या सर मुलांना आव्हान दिले गणपतीच्या सुट्ट्यांमध्ये सर्वात जास्त जो पाढे पाठ करणार त्याला एक सुंदर ट्रॉफी दिली जाणार. मुले म्हटले हो सर पाढे पाठ करतो. आज मी वर्गात आलो इयत्ता दुसरी अ चा वर्ग मुलांना म्हटले कोणी कोणी पाढे पाठ केले सांगा. मला वाटले मुलांनी जास्तीत जास्त पाच ते सहा पर्यंतचे पाढे पाठ केले असतील. परंतु आश्चर्याची बाब चार मुलांनी १७ पर्यंत चे पाढे पाठ केले होते. सेमी इंग्रजी वर्ग असल्याने पाढे इंग्रजीतच पाठ केले. इंग्रजीत पाढे पाठ करणे थोडेसे कठीण आहे. सरप्राईज तर आणखी पुढे होते. वर्गातील बऱ्यापैकी सर्वांनी पाढे पाठ करायला सुरुवात केली परंतु कुमारी स्वरा सचिन जायभाये या मुलीने चक्क 25 पर्यंत पाढे पाठ केले हे सर्व पाहून मला आश्चर्य आणि अभिमान सुद्धा वाटला. स्वराने अतिशय सुंदर पाढे बोलून दाखवले. पाढे बोलताना थोडे उच्चार चुकत होते परंतु पाढे पाठ केल्याचा आनंद मला जास्त झाला. आव्हान दिल्यामुळे तिने तिच्यातील सर्वोत्तम सादर करण्याचा प्रयत्न केला. निश्चितच तिच्या या कृतीचा मनापासून आनंद झाला.. तिचे हे यश पाहून मुले म्हटले सर आणखीन वेळ वाढवून द्या ना... मी म्हटले हो चालेल आणखी चार ट्रॉफी मी तुम्हाला देणार आहे.. पाहूया त्या चार ट्रॉफी कोण मिळवत ते. तात्पर्य आव्हानामुळे पाढे पाठांतर करण्याची नवीन ऊर्जा विद्यार्थ्यांच्या अंगी निर्माण झाली.
अशा पद्धतीने माझ्या वर्गातील मुले हळूहळू आव्हाने उत्तम रित्या पेलू लागले.. त्यामुळेच मी धन्यवाद देतो रोहिणी मॅडम यांना कारण त्यांच्या चला आव्हान देऊया या लेखामुळे माझ्यावर सकारात्मक परिणाम झाला.. आणि मी ते आव्हान स्वीकारून मुलांना आव्हान द्यायला सुरुवात केली..
धन्यवाद रोहिणी मॅडम धन्यवाद वेध परिवार..




प्रत्येक प्रश्न एक आव्हान
ज्ञानाच्या प्रकाशात उत्तर शोधूया
अपयशाला घाबरू नका मुलांनो
प्रयत्नांनी यशाची वाट काढूया..



श्री अमोल सुशीला माणिकराव गुळवे
शांतीग्राम प्राथमिक विद्यामंदिर
ता. उल्हासनगर जि. ठाणे
9359847026





महात्मा ज्योतिबा फुले भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर

## यांच्या जयंतीनिमित्य

# वेध परिवाराकडून

# हार्दिक शुभेच्छा